# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक १५३) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) शनिवार, दि.१३ जून २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## अशोक खरात प्रकरणात उज्ज्वल निकम यांची विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती

मुंबई दि.१२ (प्रतिनिधी)- अंधश्रद्धा आणि तंत्र-मंत्राच्या नावाखाली महिलांचे लैंगिक शोषण करणाऱ्या भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात आता एक अत्यंत मोठी आणि महत्त्वाची अपडेट समोर आली आहे. राज्यभर खळबळ उडवून देणाऱ्या या प्रकरणाच्या कायदेशीर लढाईत आता देशातील नामांकित कायदेतज्ज्ञ आणि ज्येष्ठ वकील अ‍ॅड. उज्ज्वल निकम यांची एन्ट्री झाली आहे.

या हाय-प्रोफाइल खटल्यात सरकारची बाजू मांडण्यासाठी राज्य शासनाने उज्ज्वल निकम यांची विशेष सरकारी वकील म्हणून अधिकृत नियुक्ती केली आहे. अ‍ॅड. निकम यांच्या एन्ट्रीमुळे या प्रकरणाशी संबंधित असलेल्या बड्या राजकीय नेत्यांचे आणि वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

स्वतःला सिद्धपुरुष आणि अंकशास्त्रज्ञ म्हणवून घेणारा भोंदूबाबा अशोक खरात प्रकरण राज्यभरात चर्चेत आले आहे. दैवी शक्तीची भीती दाखवून, गुंगीचे औषध देऊन आणि प्रसाद म्हणून दिल्या जाणाऱ्या पेढा किंवा पाण्यातून अंमली पदार्थ देऊन तो महिलांचे लैंगिक शोषण करायचा. याप्रकरणी पीडित महिलांच्या तक्रारीनंतर नाशिक पोलिसांनी खरातला अटक केली असून, या गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून याचा तपास विशेष तपास पथकाकडे सोपवण्यात आला आहे. एसआयटीने या प्रकरणाचा सखोल तपास करताना आरोपी अशोक खरात याच्या कार्यालय आणि फार्म हाऊसची कसून झडती घेतली.

# १९५० नंतरचा सर्वात भीषण एल निनो सक्रिय

## अमेरिकी हवामान संस्थेची माहिती, भारतासह महाराष्ट्रावर दुष्काळाचे सावट

मुंबई दि.१२ (प्रतिनिधी)- प्रशांत महासागरात एल निनो सक्रिय झाल्याची घोषणा सीपीसी अर्थात क्लायमेट प्रेडीक्शन सेंटरने केली आहे. यंदा १९५० नंतरचा सर्वाधिक तीव्र एल निनो राहण्याचा अंदाज देखील वर्तवण्यात आला आहे. एल निनो डिसेंबरमध्ये अति तीव्र होऊ शकतो असा अंदाज देखील आहे. २०२७ च्या पूर्वार्धातही एल निनो सक्रिय असेल असा कयास बांधला जात आहे. प्रशांत महासागरातील न्यूट्रल स्थिती जाऊन एल निनो निर्माण झाल्याची घोषणा अमेरिकी हवामानशास्त्र संस्था नोआच्या क्लायमेट प्रेडिक्शन (सीपीसी) सेंटरने गुरुवारी केली. डिसेंबरपर्यंत एल निनोची तीव्रता अतितीव्र स्वरूपाची होणार असून, यंदाचा एल निनो १९५० पासूनच्या नोंदीमधील सर्वाधिक तीव्र ठरण्याची शक्यता सीपीसीने वर्तवली आहे. सीपीसीने गुरुवारी जारी केलेल्या अंदाजानुसार, गेल्या महिनाभरात एल निनोची स्थिती



विकसित झाल्याचे निष्पन्न झाले आहे.

यंदाचा एल निनो फेब्रुवारी २०२७ मध्येही सक्रिय राहण्याची शक्यता ९० टक्क्यांहून जास्त असल्याचे सीपीसीच्या अंदाजात म्हटले आहे. प्रशांत महासागरात एलनिनो सक्रिय झाल्याची घोषणा करण्यात आली आहे.

यंदा १९५० नंतरचा सर्वाधिक तीव्र असा एल निनो राहण्याचा अंदाज वर्तवला जातोय. एल निनो डिसेंबरमध्ये अति तीव्र होऊ शकतो असाही अंदाज असेल, २०२७ च्या पूर्वार्धातही एलनेनो सक्रिय असेल असा कयास बांधला जातोय आणि अर्थातच या एल निनोचा मोठा परिणाम हा मान्सूनवर होतोय आणि त्यामुळे महाराष्ट्राला देखील त्याचा फटका बसू शकतो, सरासरी पेक्षा यंदा कमी पावसाचा अंदाज वर्तवण्यात आलेला आहे,एल निनोचा प्रभाव वाढतोय, त्याची वाटचाल सुरू झालेली आहे. याचे कसे परिणाम होऊ शकतात, एल निनोचे खास करून मान्सूनवर, या प्रश्नावरती माहिती देताना हवामान अभ्यासक मयुरेश प्रभुणे यांनी सांगितलं की, सीपीसीने अधिकृतपणे सांगितलं आपण आधीपासूनच म्हणत होतो की एल निनो (पान ४ वर)

## एल निनोचा परिणाम होणार म्हणून तयारी सुरु केली-मुख्यमंत्री

याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, 'एल निनो संदर्भात आपण तयारी करत आहोत. मी माझ्या बजेटच्या भाषणामध्येच एल निनो संदर्भात वाच्यता केली होती. त्याचा मोठा परिणाम आपल्या राज्यावर होईल. त्यामुळे त्याची तयारी आपण सुरू केलेली आहे. आपण टास्क फोर्स तयार केला आहे. जलसंधारणाची कामे मोठ्या प्रमाणावर कशी पूर्ण करता येतील हा आपला प्रयत्न आहे. कारण पाऊस कमी पडल्यानंतर मोठी धरण कामे येत नाहीत, पाऊस कमी पडल्यानंतर जलसंधारणाची छोटी स्ट्रक्चर्स कामी येतात. त्यामुळे त्यावर आपण खूप मोठ्या प्रमाणावर भर दिला आहे. प्रत्येक जिल्ह्याला टारगेट देऊन जलसंधारणाची स्ट्रक्चर्स कशी पूर्ण करायची याबाबत आपण सांगितले आहे.

चाऱ्याची टंचाई निर्माण होऊ शकते त्या दृष्टीने पशुसंवर्धन विभाग आणि कृषी विभाग यांना सूचना देऊन वैरण विकासाचा कार्यक्रम हाती घेतला आहे. जेणेकरून आपल्याकडे चारा उपलब्ध असेल. पण ही गोष्ट खरी आहे की, ज्या पद्धतीचे संकेत येत आहेत त्यात अडचण मोठी असेल, पाऊस कमी पडणार आहे, त्यातून आपण मार्ग काढू, असे त्यांनी म्हटले आहे. देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले की, विशेषतः आम्ही शेतकऱ्यांना सल्ला देत आहोत. राज्य सरकारच्या सल्ल्यावर आधारित जर शेतकऱ्यांनी पेरणी केली तर दुबार पेरणीची वेळ येणार नाही. नेहमीच्या पद्धतीने पेरणी केली तर पावसाच्या अभावामुळे पेरण्या वाया जातील आणि दुबार पेरणीची वेळ येईल. त्यामुळे आतापर्यंत शेतकऱ्यांनी संयम ठेवलेला आहे, तसाच शेतकऱ्यांनी राज्य सरकारकडून येणाऱ्या मार्गदर्शक सूचनांकडे लक्ष द्यावे. आम्ही एसएमएस देखील पाठवत आहोत, महाविस्तार अ‍ॅपवर देखील आम्ही सगळी माहिती देत आहोत, त्या अनुषंगानेच शेतकऱ्यांनी पेरण्या कराव्या, असे आवाहन देखील त्यांनी केले आहे.

# शेतकऱ्यांच्या सरसकट कर्जमाफीसाठी रोहित पवारांचे पंढरपुरात अन्नत्याग आंदोलन

पंढरपूर दि.१२ (प्रतिनिधी)- शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवार यांनी 'अन्नदात्यासाठी अन्नत्याग' आंदोलन पंढरपुरात सुरू केले. सरकारने जाचक अटी रद्द करून सरसकट कर्जमाफी जाहीर करावी. जोपर्यंत सरकार जाहीर करत नाही, तोपर्यंत आंदोलन सुरू राहील, असा इशारा आमदार रोहित पवार यांनी दिला.

राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवार हे सरकारच्या कर्जमाफी आणि विविध प्रश्नांवर रस्त्यावर उतरले आहेत. 'अन्नदात्यासाठी अन्नत्याग' आंदोलनाला पंढरपुरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे शुक्रवारी सुरुवात केली. सध्या विधान परिषदेची आचार संहिता आहे. या पार्श्वभूमीवर आमदार रोहित पवारांनी विचार करावा, असे पत्र जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांना दिले होते. पण त्या पत्राकडे दुर्लक्ष करीत आंदोलन नियोजित स्थळीच सुरू करण्यात आले. त्या ठिकाणी आंदोलन करणार आहेत, तिथे कायदा व सुव्यवस्था, वाहतूक व्यवस्थेचे कारण देत शुक्रवारी सकाळी पोलीस प्रशासनाने आमदार पवार यांना नोटीस बजावली आहे. मात्र, पवार आंदोलनावर ठाम राहिले.

या आंदोलनाला सुरुवात करण्याआधी संत नामदेव पायरी येथे जाऊन दर्शन घेतले. त्या ठिकाणी आरती केली. फडणवीस सरकारला सरसकट कर्ज माफी करण्याची बुद्धी दे, असे साकडे आमदार रोहित पवार यांनी घातले. त्या नंतर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन करून आंदोलनाच्या ठिकाणी हातात संविधान घेऊन आमदार रोहित पवार दाखल झाले. या वेळी जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस ( श.प. ) पक्षाचे आमदार राजू खरे, भाजपाच्या बैठकीला हजर राहिलेले, राष्ट्रवादीचे आमदार अभिजित पाटील यांच्यासह पदाधिकारी



आणि काही शेतकरी उपस्थित होते.

दरम्यान गेल्या आठ महिन्यांपूर्वी सरकारने कर्जमाफीचे सर्व निकष बँकांकडून यादी मागवत जाहीर केलेले होते. याची सगळी माहिती विधानसभेमध्ये चर्चेच्या वेळेस मिळाली होती. त्यावेळेस रोहित पवारांनी त्या निकषाला हरकत घेणे गरजेचे होते. त्या ठिकाणी त्यांनी बोटचेपे धोरण घेतले आणि हे आंदोलन पंढरपूर येथे घेतले. सध्या अधिक महिन्यामुळे भाविकांची प्रचंड गर्दी आहे. या गर्दीला वेठीस धरून प्रशासनावर ताण यावा म्हणून ही स्टंटबाजी करण्याचे काम रोहित पवार करत आहेत.

जर रोहित पवार यांना शेतकऱ्यांचा इतका कळवळा असेल, तर हे आंदोलन त्यांनी शेत शिवारामध्ये घ्यायला हवे होते, म्हणजे खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांच्या प्रश्नाला न्याय मिळाला असता. आता त्यांनी मात्र आपल्या आंदोलनावर ठाम राहून सरसकट कर्जमाफी मिळेपर्यंत उपोषण मागे घेऊ नये. कुठल्याही आश्वासनावर त्यांनी उपोषण मागे घेऊ नये, अशी खोचक टीका भाजप किसान मोर्चाचे सचिव माउली हळणवर यांनी केली.

# अमेरिका-इराणमध्ये ६ मुद्यांवर सहमती, जिनिव्हा येथे करार होणार

तेहरान दि.१२ (वृत्तसंस्था)-इराण आणि अमेरिका यांच्यात रविवारी स्वित्झर्लंडमधील जिनिव्हा येथे एका करारावर स्वाक्षरी होण्याची शक्यता आहे. अमेरिका आणि इराण यांच्यातील हा अंतरिम करार या आठवड्याच्या अखेरीस अंतिम होऊ शकतो. यामध्ये युद्ध टाळणे आणि होर्मुझची सामुद्रधुनी खुली करणे तसेच अणुबॉम्ब न बनवणे यावर चर्चा समाविष्ट असेल. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणसोबतचा करार अंतिम झाल्याची घोषणा केली आहे. परंतु काही मुद्द्यांवरील वाटाघाटी जिनिव्हा करारानंतर होतील.

सूत्रांनुसार, दोन्ही बाजूंनी 'सामंजस्य करारा'च्या मसुद्यावर सहमती दर्शवली आहे, तरीही त्याला अंतिम मंजुरीची आवश्यकता आहे. जिनिव्हा बैठकीसाठी करारातील सहा प्रमुख मुद्द्यांवर सहमती झाली आहे. करारावर स्वाक्षरी झाल्यावर लेबनॉनसह सर्व आघाड्यांवर ६० दिवसांची युद्धबंदी सुरू होईल. होर्मुझची सामुद्रधुनी खुली केली जाईल आणि त्यातून जाणाऱ्या जहाजांकडून इराण कोणतेही शुल्क आकारणार नाही.करार झाल्यानंतर ३० दिवसांनी होर्मुझच्या सामुद्रधुनीतील वाहतूक युद्धपूर्व पातळीवर परत येईल. इराणच्या बंदरांवरील अमेरिकेची नाकेबंदी उठवली जाईल आणि तेहरानला निर्बंधांमध्ये सूट मिळेल. या करारानुसार इराण भविष्यात अण्वस्त्रे मिळवणार नाही असे वचन आणि हमी देईल. या अमेरिका-इराण कराराला इस्लामाबाद करार म्हटले जाईल, कारण पाकिस्तान यात मध्यस्थ आहे असं सांगण्यात आले आहे.

तर गोठवलेल्या अब्जावधी डॉलर्सच्या निधीच्या सुटकेचा समावेश करारामध्ये असेल की नाही, हे त्या अधिकाऱ्याने सांगितले नाही. करारासाठी ही इराणची एक प्रमुख मागणी आहे. चर्चेच्या शेवटच्या दिवसांमध्ये होर्मुझची सामुद्रधुनी आणि इराणच्या अणुकार्यक्रमाची स्थिती यांसारख्या विषयांवर चर्चा झाली असं अधिकारी म्हणाले. अमेरिकेचे उपराष्ट्रपती जे. डी. व्हान्स हे इराणसोबतच्या कराराच्या स्वाक्षरी समारंभाला उपस्थित राहू शकतात असं डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले आहे. इराणसोबतच्या सामंजस्य करारावर (एमओयू) स्वाक्षरी करण्याचा समारंभ स्वित्झर्लंडमधील जिनिव्हा येथे होण्याची दाट शक्यता आहे. ही स्वाक्षरी रविवारी होऊ शकते असं सूत्रांच्या हवाल्याने सीएनएनने वृत्त दिले आहे.

# गुटखा विक्रेत्यांवर आता मकोका लागणार, एफडीआयच्या अधिकाऱ्यांनाही इशारा

मुंबई दि.१२ (प्रतिनिधी)- राज्यातील धडाडीचे सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांनी अन्न व औषध प्रशासन विभागाच्या आयुक्तपदी जबाबदारी सांभाळताच, कारवाईचा धडाका सुरू केला आहे. गेल्या महिनाभरात तुकाराम मुंढेंनी एकापाठोपाठ एक कारवाया करत ३ कोटी २७ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून ३५ पेक्षा जास्त गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या कारवाईनंतरही राज्यातील काही ठिकाणी अवैध गुटखा, पानमसाला आणि तत्सम पदार्थांची विक्री होत असल्याने आता आयुक्त मुंढे आणखी अ‍ॅक्शन मोडमध्ये आले आहेत. आता, उत्पादकापासून ते विक्री करणाऱ्यापर्यंत सगळ्यांवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात येणार असल्याचे तुकाराम मुंढेंनी म्हटलं.

तुकाराम मुंढे यांनी चार्ज घेतल्यापासून अन्न व औषध विभागाने राज्यभरात अनेक ठिकाणी धाडी टाकून भेसळीचा माल जप्त केला आहे. संबंधित विक्रेत्यांना अटक करून त्यांच्यावर गुन्हेही दाखल झाले आहेत. वर्तमानपत्रात -खाद्यपदार्थ विकणारे विक्रेते अन्न आणि औषध प्रशासन विभागाच्या (एफडीए) रडारवर आले आहेत. खाद्यपदार्थ वर्तमानपत्रात गुंडाळून विकू नका, अशी सक्त ताकीदही खाद्यविक्रेत्यांना देण्यात आली आहे. आता, गुटखा, तंबाखू किंवा निकोटीनयुक्त पानमसाला तसेच तत्सम तंबाखू-मिश्रित प्रतिबंधित अन्नपदार्थांचे उत्पादन, साठवणूक, वाहतूक, वितरण व विक्री करणाऱ्या संघटित नेटवर्कविरुद्ध पात्र प्रकरणांत महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम, १९९९ (मकोका) लागू करण्याबाबत सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना तुकाराम मुंढेंनी निर्देश दिले आहेत. उत्पादकापासून ते विक्री करणाऱ्यापर्यंत सगळ्यांना हा नियम लागू असून मकोका कायद्यानुसार गुन्हा दाखल केला जाईल. मकोका गुन्हा दाखल करण्यासाठी आरोपीचा इतिहास पाहून आवश्यक त्या गुन्ह्यानुसार कारवाई केली जाणार, असल्याचे तुकाराम मुंढे यांनी स्पष्ट केले.

# बंगालमध्ये निवडणुकीत वापरलेले ४,००० ईव्हीएम जळून खाक

कोलकाता दि.१२ (वृत्तसंस्था)- पश्चिम बंगालमधील एका सरकारी इमारतीला भीषण आग लागल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या आगीत सुमारे ४,००० इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे जळून खाक झाली. हे ईव्हीएम मशिन विधानसभा निवडणुकीदरम्यान वापरली होती. ही माहिती सुवेंदु सरकारमधील मंत्री कौशिक चौधरी यांनी दिली.

'या घटनेप्रकरणी एफआयआर दाखल झाल्यानंतर पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला आहे. दक्षिण कोलकात्याच्या अलीपूर भागातील नऊ मजली इमारतीला बुधवारी भीषण आग ल गली. या इमारतीत इतर विभागांव्यतिरिक्त दक्षिण २४ परगणा जिल्हा परिषदेचे कार्यालयही होते.

मंत्री चौधरी म्हणाले, आगीत ४,००० ईव्हीएम नष्ट झाल्या आहेत. यावर्षी झालेल्या राज्य विधानसभा निवडणुकीदरम्यान १० मतदारसंघांमध्ये हे ईव्हीएम वापरण्यात आले होते, 'ही सामान्य आग वाटत नाही. यात काही घातपात झाला होता का, याचा आम्ही तपास करत आहोत. आग नक्की आणि दहाव्या मजल्यापर्यंत कशी पोहोचली हे अद्याप स्पष्ट झालेले नाही.' त्यांनी सांगितले की, इमारतीच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या मजल्यावर आधी आग लागलेली दिसली.

'चौथ्या, पाचव्या आणि सहाव्या मजल्यांना कोणताही धोका न पोहोचवता आग सातव्या आणि आठव्या मजल्यापर्यंत कशी पोहोचली? संपूर्ण प्रकरणाची चौकशी सुरू आहे,' असेही चौधरी म्हणाले. घटनेची अधिक चांगली माहिती मिळवण्यासाठी आपण फॉरेन्सिक अहवाल ची वाट पाहत असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, आग लागल्यानंतर जवळपास २४ तासांनीही अग्निशमन दल आग विझवण्यासाठी प्रयत्न करत होते. सकाळी आगीच्या ज्वाला दिसत नसल्या तरी, वेगवेगळ्या ठिकाणी आग लागण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाचा प्रस्ताव पवार साहेबांना दिला होता, पण निर्णय घेण्यास उशीर झाला-नाना पटोले

मुंबई दि.१२ (प्रतिनिधी)- देशातील बहुतांश राज्यांमध्ये सत्तास्थापन करुन प्रादेशिक पक्षांना नामोहरम करणाऱ्या भाजपचा आगामी काळात सामना करण्याच्यादृष्टीने शरद पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा मूळ काँग्रेसमध्ये विलीन करण्याच्या चर्चेने सध्या जोर धरला आहे. शरद पवार गट आणि काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांमध्ये त्यादृष्टीने विचारमंथन सुरु असल्याची माहिती आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेस हायकमांडने महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांना दिल्लीत बोलावून घेतले होते. त्यानंतर माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनाही हायकमांडने दिल्लीला बोलावल्याने वर्तुळाच्या भुवया उंचावल्या गेल्या आहेत. (पान ४ वर) राजकीय

## कोणताही प्रस्ताव नाही-शशिकांत शिंदे

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून विलिनीकरणासंदर्भातील कोणताही प्रस्ताव काँग्रेस पक्षाला देण्यात आलेला नाही, असे स्पष्टीकरण शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी दिले आहे. काँग्रेसकडून देखील तसा कोणताही प्रस्ताव आलेला नाही, असे शशिकांत शिंदे यांनी सांगितले. प्रस्ताव जर आला असता तर नक्कीच वरिष्ठ नेतृत्वाकडून आम्हाला त्याबाबत कल्पना देण्यात आली असती, असेही शशिकांत शिंदे यांनी म्हटले. काल सकाळी शरद पवार यांच्या उपस्थितीत सिल्वर ओक या निवासस्थानी पक्षाची बैठक झाली. या बैठकीमध्येसुद्धा काँग्रेसमध्ये विलीन होण्याच्या कोणत्याही प्रस्तावावर शरद पवार यांची आमच्यासोबत चर्चा झाली नाही. अशा प्रस्तावाच्या संदर्भात माझ्यापर्यंत अशी कोणतीही माहिती आलेली नाही. त्यामुळे समोर आलेल्या बातमीमध्ये तथ्य नाही, अशी माहिती प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी दिली.

## सावकारीच्या व्याजासाठी महिलेला वेश्या व्यवसाय करण्यास भाग पाडले

कोल्हापूर दि.१२ (प्रतिनिधी)- कोल्हापूर जिल्ह्यातून महाराष्ट्राला हादरवणारी एक बातमी समोर येत आहे. सावकारीच्या व्याजासाठी महिलेला वेश्या व्यवसाय करायला भाग पाडल्याचं प्रकरण समोर आलं आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील इचलकरंजीमध्ये हा धक्कादायक प्रकार घडला आहे. ओळखीच्या एजंटकडे महिलेला सोपवून व्याजाची वसुली केली आहे. अडचणीच्या काळात ऊसने घेतलेल्या पैशावर भरमसाठ व्याज लावल्याचे समोर आले आहे.

# अमेरिकेची धोरणं धरसोडीची; भारताची तेलाची ४० टक्के आयात रशियाकडून-एस.जयशंकर

नवी दिल्ली दि.१२ (वृत्तसंस्था)- अमेरिका आणि इराणमधील वाढत्या तणावाचा जगातील अनेक देशांना मोठा फटका बसला आहे. त्यामुळे मागील काही महिन्यांपासून कच्च्या तेलाचा मुद्दा प्रामुख्याने चर्चेत आहे. रशियाकडून खरेदी केल्या जाणाऱ्या कच्च्या तेलावरून अमेरिका आणि भारत यांच्यात मध्यंतरी तणाव निर्माण झाला होता. भारताने रशियाकडून कच्च्या तेलाची खरेदी थांबवण्यासाठी अमेरिकेकडून प्रयत्न सुरू होते. मात्र, भारताने अमेरिकेच्या दबावाला जुमानलं नाही. भारताचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी आता कच्च्या तेलाच्या मुद्यांवरून अमेरिकेच्या बदलत्या आणि दुटप्पी भूमिकांवर जोरदार टीका केली आहे. 'अमेरिका कोणत्याही निश्चित तत्त्वावर नाही, तर केवळ स्वतःच्या हितानुसार निर्बंध किंवा आयात शुल्क (टॅरिफ) लादते किंवा उठवते', अशी टीका एस.जयशंकर यांनी केली. अमेरिकेची धोरणं ही धरसोडीची असल्याचं स्पष्ट करत भारताची कच्च्या तेलाची ४० टक्के आयात रशियाकडूनच असल्याचं पुन्हा एकदा जयशंकर यांनी स्पष्ट केलं आहे. फिनलंडमधील एका कार्यक्रमात बोलताना मंत्री एस. जयशंकर यांनी भारताच्या राष्ट्रीय हिताचं आणि ऊर्जा सुरक्षेचं समर्थन करत रशियाकडून तेल खरेदी करण्याच्या भारताच्या निर्णयाचं समर्थन केलं. रशियन तेलाबाबत पाश्चात्य देशांच्या बदलत्या भूमिकेचा उल्लेख करताना एस.जयशंकर यांनी म्हटलं की, ''यात काही मोठं तत्त्व गुंतलेलं आहे असा आव आणू नये. जेव्हा त्यांना सोयीचं वाटतं तेव्हा ते तसं करतात आणि सोयीचं वाटत नाही तेव्हा ते करत नाहीत.''

दरम्यान, रशियाबरोबरचे भारताचे संबंध आणि रशियन तेलाची खरेदी यांबाबत विचारलेल्या प्रश्नावर उत्तर देताना एस.जयशंकर यांनी म्हटलं की, ''भारताचे ऊर्जेबाबतचे निर्णय हे भू-राजकारणापेक्षा परवडणारी किंमत आणि उपलब्धता यांवर आधारित असतात. मी या ठिकाणी दोन गोष्टी नमूद करतो. आम्ही किंमत आणि उपलब्धता पाहूनच तेलाची खरेदी करतो. त्या काळात बाजारात रशियन तेल मोठ्या प्रमाणात उपलब्ध होतं. कारण युरोपीय देश प्रामुख्याने मध्य पूर्वेकडून तेल खरेदी करत होते. त्यामुळे रशिया आमचा पारंपरिक (पान ४ वर)

# अमेरिकेच्या हल्ल्यात तीन भारतीयांच्या मृत्यूनंतर राहुल गांधींची पंतप्रधानांवर टीका

नवी दिल्ली दि.१२ (वृत्तसंस्था)- इराणची कोंडी करण्यासाठी अमेरिकन नौदलाने काही दिवसांपासून आक्रमक पवित्रा घेतला. इराणला लक्ष्य करण्यासाठी अमेरिकेकडून करण्यात आलेल्या हल्ल्यात एका मालवाहू जहाजावरील तीन भारतीय खलाशांचा मृत्यू झाल्याचे समोर आले. या घटनेचे तीव्र पडसाद पडत असून पश्चिम आशियातील युद्धात भारतीय नागरिकांचे रक्षण करण्यासाठी सरकार गंभीर नसल्याची टीका विरोधकांनी केली. यानंतर आता लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी थेट पंतप्रधान मोदींना लक्ष्य केले आहे.

राहुल गांधी यांनी एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये पंतप्रधान मोदींवर बोचरी टीका केली. ते म्हणाले, ''आंतरराष्ट्रीय समुद्रात तीन दिवसांत तीन जहाजांवर अमेरिकेने हल्ला केला. यामध्ये तीन भारतीय खलाशांचा मृत्यू झाला. पण आपले कॉम्प्रमाइज्ड पंतप्रधान एक शब्दही बोलले नाहीत.''

''जेव्हा विदेशी शक्ती कोणत्याही भारतीय नागरिकाची हत्या करते, तेव्हा पंतप्रधानांना बोलावे लागते. पण आपले पंतप्रधान एक शब्दही उच्चारण्याची हिंमत दाखवत नाहीत'', अशी टीका राहुल गांधी यांनी केली.

राहुल गांधी यांनी मोदीच्या विदेश दौऱ्यांचा दाखला देऊन त्यांच्या परराष्ट्र धोरणावर टीका केली. पंतप्रधान मोदी आंतरराष्ट्रीय शिखर परिषदा, बैठका आणि जागतिक नेत्यांच्या भेटी-गाठी असतात, याचाच संदर्भ गांधी यांनी दिला.

लोकसभेचे विरोधी पक्षनेते गांधी पुढे म्हणाले, ''पुढच्या आठवड्यात जी७ होणार आहे. आपल्या खलाशांच्या हत्येनंतर काही दिवसातच पंतप्रधान मोदी पुन्हा खळखळून हसतील, नेत्यांना मिठ्या मारतील आणि काहीतरी करार करतील. पण त्या मृत तीन भारतीयांसाठी मात्र त्यांच्याकडे शब्द नाहीत.''

# मोदी सर्वाधिक काळ पंतप्रधान तसेच कामही सर्वोत्कृष्ट-फडणवीस

मुंबई दि.१२ (प्रतिनिधी)- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारला १२ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी पत्रकार परिषद घेऊन मोदी सरकारच्या कामगिरीचा गौरव केला. देशाची अर्थव्यवस्था, पायाभूत सुविधा, डिजिटल व्यवहार, महिला सक्षमीकरण, गरिबी निर्मूलन आणि जागतिक स्तरावरील भारताची वाढती प्रतिष्ठा यांचा उल्लेख करत फडणवीस यांनी मोदी यांना ''केवळ सर्वाधिक काळ निवडून आलेले पंतप्रधान नव्हे, तर देशाचे सर्वोत्कृष्ट पंतप्रधान'' असे संबोधले. याचवेळी त्यांनी काँग्रेस आणि विरोधी पक्षांच्या संभाव्य विलीनीकरणाच्या चर्चेवरही टीका करत काँग्रेसला ''बुडते जहाज'' म्हटले.

फडणवीस म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ४,३९९ दिवसांचा कार्यकाळ पूर्ण करत देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचा सर्वाधिक काळ निवडून आलेल्या पंतप्रधानांचा विक्रम मोडला आहे. महाराष्ट्रातील १४ कोटी जनतेच्या वतीने त्यांनी मोदी यांचे अभिनंदन केले.

त्यांच्या मते, एखाद्या नेत्याचा कार्यकाळ किती मोठा आहे (पान ४ वर)

# डिझेल खरेदीवर केंद्र सरकारची मर्यादा; एका वाहनाला जास्तीत जास्त २०० लिटर डिझेल मिळणार

नवी दिल्ली दि.१२ (वृत्तसंस्था)- जागतिक भू-राजकीय परिस्थिती, आंतरराष्ट्रीय पेट्रोलियम पुरवठा साखळीतील अडचणी आणि देशातील काही भागांत पेट्रोल-डिझेलच्या असमान्य खरेदीमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने ''मोटर स्पिरिट आणि हाय स्पीड डिझेल (किरकोळ विक्री केंद्रांमार्फत पुरवठ्याचे तात्पुरते नियमन) आदेश जारी केला आहे. पेट्रोल पंपावर एका वाहनाला जास्तीत जास्त २०० लिटर डिझेल मिळणार आहे. हा आदेश ११ जून २०२६ रोजी राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आला असून तो तत्काळ लागू झाला आहे.

आदेशात म्हटले आहे, पेट्रोल (मोटर स्पिरिट) आणि डिझेल (हाय स्पीड डिझेल) या अत्यावश्यक वस्तू असून मालवाहतूक, प्रवासी वाहतूक, शेतीची कामे, आपत्कालीन सेवा, राष्ट्रीय सुरक्षा आणि अर्थव्यवस्थेच्या सुरळीत कामकाजासाठी त्यांचा अखंड पुरवठा आवश्यक आहे.

केंद्र सरकारच्या निरीक्षणानुसार, किरकोळ विक्री केंद्रांवरील (पेट्रोल पंपांवरील) आणि घाऊक विक्रीतील किंमतीमध्ये असलेल्या फरकामुळे अनेक औद्योगिक, व्यावसायिक आणि संस्थात्मक ग्राहक मोठ्या प्रमाणात पेट्रोल पंपांवरून डिझेल खरेदी करत आहेत. यामुळे सामान्य ग्राहकांसाठी राखीव असलेला पुरवठा वळविला जात असून काही भागांत स्थानिक तुटवड्याची शक्यता निर्माण झाली आहे. तसेच साठेबाजी, अनधिकृत विक्री आणि इतर गैरप्रकारांना चालना मिळण्याची भीतीही व्यक्त करण्यात आली आहे.

संस्थात्मक, औद्योगिक आणि व्यावसायिक ग्राहकांना किरकोळ विक्री केंद्रांवरून (पेट्रोल पंपांवरून) पेट्रोल किंवा (पान ४ वर)

# अधिक मासातील रंजक, पण चिंताजनक चित्र

**हिंदू** संस्कृतीत तीन वर्षांनी येणाऱ्या अधिक मासात (धोंड मास) जावयाला घरी बोलावून त्याचा शाही पाहुणचार करण्याची आणि त्याला गोडधोड खाऊ घालण्याची एक सुंदर प्रथा म्हणजे 'धोंडे जेवण'. मात्र अधिक मासनिमित्त केला जाणारा धोंडे जेवणाचा कार्यक्रम वेगळ्याच वळणावर येऊन थांबलेला आहे.

अधिक मासानिमित्त सासुरवाडीत सध्या जावयांसाठी पुरणपोळी, आमरसासोबत धोंडे जेवण देऊन सोन्याच्या अंगठीसह आहेर केला जात आहे. मराठवाड्यात धोंडे जेवणाबाबत अनेक रंजक घटना समोर येत आहेत. काही ठिकाणी तर चक्क राजकीय मंडळींकडून धोंडे जेवणाचे कार्यक्रम आयोजित केले जात आहेत. त्यामध्ये नर्तकींचे सादरीकरण, ऑर्केस्ट्रा आणि गावजेवण अशा माध्यमातून विविध प्रयोगही पाहायला मिळत आहेत. बीड जिल्ह्यात एका मांजरीने सोन्याची अंगठी ठेवलेला धोंडा खाल्ल्याची घटना घडली. त्यानंतर त्या मांजरीला चार दिवस कैदेत ठेवण्यात आले. तरीही अंगठी सापडत नसल्याने शेवटी शस्त्रक्रिया करून मांजरीच्या पोटातून ती अंगठी काढण्यात आली.

नांदेड जिल्ह्यातील लोहा तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस समर्थक असलेल्या एका पदाधिकाऱ्याने धोंडे जेवणाचा कार्यक्रम नर्तक-नर्तकींच्या सादरीकरणासह पार पाडला. दरम्यान, हिंगोली जिल्ह्यात धोंडे जेवणासाठी सासुरवाडीला आलेल्या एका जावयाला जुन्या वादातून चुलत मेहुण्याने बेदम मारहाण केल्याची घटना घडली. औंढा नागनाथ तालुक्यातील येडू येथे ही घटना घडली. लाकडी काठीने झालेल्या मारहाणीत जावई जखमी झाला असून, हे प्रकरण पोलिसांपर्यंत गेले आहे. त्यानंतर औंढा नागनाथ पोलीस स्थानकात या प्रकरणी गुन्हा देखील दाखल करण्यात आला. अधिक मासनिमित्त केला जाणारा धोंडे जेवणाचा कार्यक्रम वेगळ्याच वळणावर येऊन थांबलेला आहे.

आणखी एक हृदयद्रावक घटना बीड जिल्ह्यात काल घडली. अधिक मासाच्या निमित्ताने माजलगाव तालुक्यातील श्रीक्षेत्र पुरुषोत्तमपुरी येथे दर्शनासाठी मोठ्या संख्येने भाविक दाखल झाले होते. याच गर्दीदरम्यान, काही भाविकांची बोट अचानक उलटल्याची दुर्घटना घडली. या अपघातात दोन महिलांचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला असून, बारा महिला गंभीर जखमी झाल्या आहेत. मृत झालेल्या दोन्ही महिला विदर्भातील असल्याची माहिती मिळाली आहे. जखमींपैकी एका महिलेला वेळेत वैद्यकीय उपचार मिळाल्यामुळे तिचा जीव वाचवण्यात यश आले. प्राथमिक तपासात बोटीत क्षमतेपेक्षा अधिक भाविक बसवण्यात आल्याने ही दुर्घटना घडल्याचे तहसीलदार दामोदर जाधव यांनी स्पष्ट केले आहे. प्रशासनाकडून पुढील तपास सुरू असून, सुरक्षा व्यवस्थेतील त्रुटींचाही आढावा घेतला जात आहे. दरम्यान, अधिक मासानिमित्त मराठवाड्यातील सर्वच बसस्थानकांवर प्रवाशांची मोठी गर्दी दिसून येत आहे. जावयांचा मानसन्मान, तसेच त्यांना दिले जाणारे स्नेहभोजन यामुळे ग्रामीण भागात सध्या उत्साहाचे आणि सणासुदीचे वातावरण निर्माण झाले आहे. धार्मिक स्थळांवरही मोठ्या प्रमाणावर भाविकांची वर्दळ पाहायला मिळत असून, सर्वत्र श्रद्धा आणि उत्साहाचे वातावरण आहे.

माहूर येथील रेणुका देवी, औंढा नागनाथ येथील नागनाथ मंदिर तसेच परळी येथील मंदिर परिसरात सध्या अधिक मास आणि धोंडे जेवणानिमित्त भाविकांची मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. विशेषतः जावई व लेकींना धोंडे जेवणासाठी निमंत्रित करण्याची परंपरा ग्रामीण भागात आजही मोठ्या उत्साहात पाळली जात असून, कुटुंबातील आपुलकी, स्नेह आणि सामाजिक नातेसंबंध अधिक दृढ करण्याचा एक भाग म्हणून या प्रथेकडे पाहिले जाते. या निमित्ताने धार्मिक स्थळांवर केवळ धार्मिक विधीच नव्हे तर सामाजिक भेटीगाठी, कौटुंबिक एकत्रीकरण आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचेही आयोजन मोठ्या प्रमाणात होत आहे. दुसरीकडे, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर या परंपरेला राजकीय रंगही चढताना दिसत आहे, असे काही ठिकाणी बोलले जात आहे.

विधान परिषदेच्या राजकीय समीकरणांवर प्रभाव टाकण्यासाठी काही उमेदवारांकडून मतदारांशी संपर्क वाढवण्याचे प्रयत्न विविध माध्यमांतून सुरू असल्याचे चित्र दिसते. त्यातच धोंडे जेवणाच्या निमित्ताने मतदारांना सहलीचे निमंत्रण देणे, लहान-मोठ्या भेटवस्तू देणे किंवा पॅकेज टूर्सचे आयोजन करणे अशा गोष्टी घडत असल्याच्या चर्चा ग्रामीण भागात रंगत आहेत. काही ठिकाणी निवडक मतदारांसाठी विशेष सहलींची व्यवस्था, तर काही ठिकाणी गटागटाने प्रवासाची सोय केली जात असल्याचेही सांगितले जाते.

मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांत या धोंडे जेवणाच्या सरसकथा ऐकावयास मिळत आहेत. यंदाचा अधिक मास हा राजकारणी लोकांना पावणारा ठरत आहे. सत्ताधारी मतदारच नव्हे, तर विरोधी पक्षांतील मतदारही धोंडे जेवणाच्या निमित्ताने मिळणाऱ्या पॅकेज टूर्सचा फायदा घेत आहेत. अधिक मासाच्या या काळात मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये धोंडे जेवणाच्या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन मोठ्या प्रमाणात होत आहे. सत्ताधारी असो वा विरोधी पक्ष, अनेक राजकीय घटक या कार्यक्रमांच्या माध्यमातून जनसंपर्क वाढविण्याचा प्रयत्न करत असल्याचे दिसून येते.

काही ठिकाणी हे कार्यक्रम सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रम म्हणून साजरे होत असले तरी, त्यातून राजकीय उपस्थिती आणि प्रभाव दाखविण्याची संधीही घेतली जात असल्याची चर्चा आहे. परिणामी, ग्रामीण भागात या कार्यक्रमांना उत्सवी स्वरूप प्राप्त झाले असून, लोकांमध्ये त्याबद्दल उत्सुकता आणि चर्चा दोन्ही वाढल्या आहेत. दरम्यान, काही भागांमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोन्याच्या खरेदीबाबत केलेल्या आवाहनाचा संदर्भ देत असले तरी, ग्रामीण भागात धोंडे जेवणाच्या वेळी जावयाला सोन्याची अंगठी देण्याची परंपरा आजही काही कुटुंबांमध्ये पाळली जात असल्याचे दिसते. सोन्याला मान देण्याची ही जुनी प्रथा सामाजिक प्रतिष्ठा आणि आपुलकीचे प्रतीक मानली जाते. त्यामुळे आधुनिक आर्थिक आवाहनांनंतरही काही रूढी-परंपरा ग्रामीण संस्कृतीत टिकून राहिल्याचे चित्र स्पष्टपणे दिसून येते. एकूणच, अधिक मासातील धोंडे जेवणाच्या निमित्ताने धार्मिक श्रद्धा, कौटुंबिक स्नेह, सामाजिक परंपरा आणि राजकीय हालचाली यांचा एकत्रित संगम मराठवाड्यातील ग्रामीण भागात पाहायला मिळत आहे. या सर्व घडामोडींमुळे या काळाला एक वेगळे सामाजिक आणि राजकीय महत्त्व प्राप्त झाले असून, स्थानिक पातळीवर त्यावर विविध चर्चांना उधाण आले आहे.

# पावसाच्या चाहुलीत पेरणीचे नियोजन : बदलत्या वातावरणात शेतकऱ्यांची सज्जता

भारतीय कृषी व्यवस्थेचा कणा असलेला शेतकरी आजही मोठ्या प्रमाणात निसर्गावर अवलंबून आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाने प्रगतीची अनेक शिखरे गाठली असली, तरी शेतीच्या बाबतीत पाऊस हा अजूनही सर्वांत महत्त्वाचा घटक मानला जातो. विशेषतः महाराष्ट्रासारख्या राज्यात खरीप हंगामाची सुरुवात ही मान्सूनच्या आगमनाशी निगडित असते. जून महिन्याच्या सुरुवातीपासूनच शेतकऱ्यांच्या नजरा आकाशाकडे लागलेल्या असतात. काळे ढग दाटून येतात, वाऱ्यांची दिशा बदलते आणि वातावरणात ओलावा वाढू लागतो. ही केवळ ऋतूची चाहूल नसते, तर ती लाखो शेतकरी कुटुंबांच्या आशा-आकांक्षांची सुरुवात असते. बी-बियाण्यांच्या पिशव्या, नांगरलेली शेतजमीन, खतांची उपलब्धता आणि आर्थिक नियोजन या साऱ्या गोष्टी पावसाच्या वेळेवर आणि स्वरूपावर अवलंबून असतात. त्यामुळे पेरणीसाठी योग्य वेळ निश्चित करणे ही शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाची बाब ठरते.

सन २०२६ च्या खरीप हंगामाकडे पाहिले असता, हवामानातील बदल आणि मान्सूनच्या अनिश्चित स्वरूपामुळे शेतकऱ्यांसमोर नवी आव्हाने उभी राहिली आहेत. भारतीय हवामान विभागाने यंदा मान्सून समाधानकारक राहण्याची शक्यता व्यक्त केली असली, तरी पावसाचे भौगोलिक वितरण, त्याची तीव्रता आणि कालावधी यामध्ये असमानता आढळण्याची शक्यता नाकारता येत नाही. काही भागांत अतिवृष्टी, तर काही ठिकाणी दीर्घकालीन पावसाचा खंड अशा परिस्थितींना सामोरे जाण्याची तयारी शेतकऱ्यांना ठेवावी लागत आहे. त्यामुळे केवळ पाऊस सुरू झाला म्हणून पेरणी करण्याऐवजी, त्याची सातत्यता आणि जमिनीत साचणारी ओल यांचा विचार करून निर्णय घेणे आवश्यक ठरते.

महाराष्ट्रातील खरीप हंगामात प्रामुख्याने सोयाबीन, कापूस, तूर, उडीद, मूग, भात, मका आणि बाजरी यांसारख्या पिकांची लागवड केली जाते. राज्यातील विदर्भ, मराठवाडा, खानदेश, पश्चिम महाराष्ट्र आणि कोकण या विभागांमध्ये पर्जन्यमान आणि जमिनीचा प्रकार वेगवेगळा असल्याने पेरणीचा कालावधीही बदलतो. कोकणात जूनच्या पहिल्या पंधरवड्यात पेरणी सुरू होते, तर मराठवाडा आणि विदर्भातील काही भागांत पावसाच्या नियमिततेनुसार जूनच्या उत्तरार्धात किंवा जुलैच्या प्रारंभी पेरणी केली जाते. कृषी तज्ज्ञांच्या मते, सलग काही दिवस पुरेसा पाऊस झाल्यानंतर जमिनीत आवश्यक ओल निर्माण झाल्यासच पेरणी करणे अधिक फायदेशीर ठरते. घाईघाईने केलेली पेरणी आणि त्यानंतर पडलेला पावसाचा खंड यामुळे दुबार पेरणीची वेळ येऊ शकते, ज्याचा थेट परिणाम उत्पादन खर्चावर होतो. बदलत्या हवामानामुळे शेती क्षेत्रात निर्माण होणाऱ्या समस्यांचे गांभीर्य दिवसेंदिवस वाढत आहे. तापमानातील वाढ, अवेळी पाऊस, गारपीट, दीर्घकाळ दुष्काळी परिस्थिती किंवा अचानक होणारी अतिवृष्टी या घटना आता अपवाद राहिलेल्या नाहीत. हवामान बदलाचा सर्वाधिक परिणाम हा कृषी क्षेत्रावर होत असून, त्याचा फटका सर्वसामान्य शेतकऱ्यांना बसत आहे. शेतीमालाच्या उत्पादनात घट, रोग-किडींचे वाढते प्रमाण आणि उत्पादन खर्चातील वाढ यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती अधिकच डळमळीत होत आहे. त्यामुळे हवामानाशी सुसंगत शेती व्यवस्थापन विकसित करणे ही काळाची गरज बनली आहे.

आजच्या काळात हवामानाचा अंदाज आणि कृषी नियोजन यांचा परस्परसंबंध अधिक दृढ झाला आहे. भारतीय हवामान विभाग, कृषी विद्यापीठे आणि कृषी विज्ञान केंद्रांकडून वेळोवेळी शेतकऱ्यांना हवामानविषयक सल्ला दिला जातो. मोबाईल संदेश, विविध ॲप्स, रेडिओ, दूरदर्शन आणि सामाजिक माध्यमांच्या माध्यमातून हवामानविषयक माहिती सहज उपलब्ध होत आहे. तथापि, या माहितीचा उपयोग करून वैज्ञानिक पद्धतीने निर्णय घेणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण वाढविण्याची गरज आहे. हवामानाचा अंदाज, पिकांची निवड, पेरणीचा कालावधी आणि खत व्यवस्थापन यांचा योग्य समन्वय साधल्यास संभाव्य नुकसान टाळता येऊ शकते.

पेरणीपूर्व नियोजनामध्ये जमिनीची तयारी हा अत्यंत महत्त्वाचा टप्पा असतो. उन्हाळ्यात खोल नांगरट केल्यामुळे जमिनीतील कीड-रोगांचे नियंत्रण होण्यास मदत होते. तसेच पावसाचे पाणी जमिनीत अधिक प्रमाणात मुरते. शेतातील तणांचे व्यवस्थापन, बांधबंदिस्ती, चर खोदणे आणि मृदसंधारणाच्या उपाययोजना या गोष्टी वेळेत पूर्ण करणे आवश्यक असते. पावसाच्या प्रत्येक थेंबाचे संवर्धन करण्यासाठी शेततळी, जलसाठे आणि समतल चर यांचा उपयोग प्रभावी ठरू शकतो.

बियाण्यांची निवड करताना शेतकऱ्यांनी केवळ बाजारातील उपलब्धतेवर अवलंबून न राहता, स्थानिक हवामान आणि जमिनीच्या प्रकारानुसार शिफारस केलेल्या जातींची निवड करावी. कृषी विद्यापीठांनी विकसित केलेल्या सुधारित आणि रोगप्रतिकारक जातींचा अवलंब केल्यास उत्पादनवाढीस मदत होते. प्रमाणित बियाण्यांचा वापर, बीजप्रक्रिया आणि योग्य अंतर राखून पेरणी या बाबींकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. बियाण्यांचा दर्जा हा उत्पादनाच्या गुणवत्तेशी थेट संबंधित असल्याने, त्यामध्ये कोणतीही तडजोड करता कामा नये.

मृदा परीक्षण हे आधुनिक शेतीचे महत्त्वाचे अंग मानले जाते. जमिनीतील अन्नद्रव्यांची उपलब्धता, सामू, सेंद्रिय कर्बाचे प्रमाण आणि इतर घटकांची माहिती मृदा परीक्षणाद्वारे मिळते. त्यानुसार खतांचा संतुलित वापर केल्यास उत्पादन खर्च कमी होतो आणि जमिनीचे आरोग्य टिकवून ठेवता येते. अनेकदा शेतकरी अंदाजाच्या आधारावर खतांचा वापर करतात, परिणामी अनावश्यक खर्च वाढतो. मृदा आरोग्य पत्रिकेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना वैज्ञानिक पद्धतीने खत व्यवस्थापन करता येते.

शेती क्षेत्रात पारंपरिक ज्ञान आणि आधुनिक तंत्रज्ञान यांचा समन्वय साधणे आज अत्यंत आवश्यक झाले आहे. पूर्वीचे शेतकरी स्थानिक हवामान, पक्ष्यांचे स्थलांतर, वाऱ्यांची दिशा आणि निसर्गातील बदल यांच्या आधारे शेतीचे नियोजन करीत असत. आज उपग्रह तंत्रज्ञान, हवामान अंदाज प्रणाली, ठिबक सिंचन, यांत्रिकीकरण आणि डिजिटल कृषी सेवा यांचा वापर करून अधिक अचूक नियोजन करता येत आहे. मात्र, या तंत्रज्ञानाचा लाभ लहान आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे.

कृषी क्षेत्रातील अनिश्चिततेमुळे शेतकऱ्यांमध्ये मानसिक तणावाचे प्रमाणही वाढत आहे. उत्पादन खर्च, बाजारभावातील चढ-उतार, कर्जाचा बोजा आणि नैसर्गिक आपत्ती यांचा एकत्रित परिणाम त्यांच्या जीवनमानावर होत आहे. त्यामुळे शेती ही केवळ उत्पादनाची प्रक्रिया नसून, ती सामाजिक आणि आर्थिक व्यवस्थेशी निगडित बाब असल्याचे लक्षात घ्यावे लागेल. शेतकऱ्यांच्या समस्या समजून घेऊन त्यांना योग्य मार्गदर्शन, आर्थिक पाठबळ आणि मानसिक आधार देण्याची जबाबदारी समाज आणि शासन या दोघांचीही आहे. खरीप हंगामाच्या सुरुवातीला घेतलेले योग्य निर्णय संपूर्ण हंगामाच्या यशावर परिणाम करतात. पावसाचे आगमन, त्याची सातत्यपूर्ण नोंद, मृदेतील ओलावा आणि उपलब्ध संसाधने यांचा सखोल विचार करून पेरणी केल्यास संभाव्य जोखीम कमी करता येते. बदलत्या वातावरणात शेतकऱ्यांची सज्जता ही केवळ तांत्रिक बाब नसून, ती दूरदृष्टी, शिस्त आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांची एकत्रित अभिव्यक्ती आहे.

आज गरज आहे ती शेतकऱ्यांपर्यंत योग्य माहिती वेळेत पोहोचविण्याची. कृषी विभाग, संशोधन संस्था, कृषी विद्यापीठे आणि स्वयंसेवी संस्था यांनी समन्वयाने काम करून हवामान बदलाशी जुळवून घेणाऱ्या शेती पद्धतींचा प्रसार करणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांच्या अनुभवांना आणि स्थानिक ज्ञानाला आधुनिक विज्ञानाची जोड मिळाल्यास कृषी क्षेत्र अधिक सक्षम बनू शकते.

महाराष्ट्राच्या कृषी परंपरेने अनेक संकटांचा सामना करत प्रगतीचा मार्ग शोधला आहे. दुष्काळ, पूर, बाजारपेठेतील अनिश्चितता आणि बदलते हवामान या सर्व आव्हानांवर मात करत शेतकरी आजही नव्या आशेने पेरणीसाठी सज्ज होत आहे. पावसाच्या प्रत्येक सरीसोबत त्याच्या मनात नव्या स्वप्नांची पालवी फुटत असते. हीच जिद्द आणि कष्ट करण्याची तयारी महाराष्ट्राच्या कृषी संस्कृतीची खरी ताकद आहे. कृषी क्षेत्रातील बदलत्या वास्तवाचा विचार करता जलव्यवस्थापनाचे महत्त्व अधिक अधोरेखित होते. महाराष्ट्र हा भौगोलिकदृष्ट्या विविधतेने नटलेला प्रदेश असला, तरी पाण्याच्या उपलब्धतेच्या बाबतीत अनेक भाग संवेदनशील आहेत. कोकणातील अतिवृष्टी आणि मराठवाडा-विदर्भातील दुष्काळी परिस्थिती हे विरोधाभासी चित्र राज्यात वारंवार पाहायला मिळते. अशा परिस्थितीत पावसाच्या पाण्याचे योग्य नियोजन आणि संवर्धन करणे ही काळाची गरज बनली आहे. शेततळी, बंधारे, समतल चर, शेतबांध, कंटूर बंडिंग, पाझर तलाव आणि जलसंधारणाच्या इतर उपाययोजनांमुळे पाण्याचा कार्यक्षम वापर करता येतो. पावसाच्या प्रत्येक थेंबाचे जतन करण्याची मानसिकता विकसित झाली, तर भविष्यातील पाणीटंचाईची तीव्रता मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते. ठिबक सिंचन आणि तुषार सिंचनासारख्या सूक्ष्म सिंचन पद्धतींमुळे पाण्याची बचत होण्याबरोबरच खतांचाही कार्यक्षम वापर शक्य होतो. विशेषतः फळबागा, भाजीपाला आणि नगदी पिकांसाठी या पद्धती अत्यंत उपयुक्त ठरतात.

खरीप हंगामात पीक संरक्षण हा आणखी एक महत्त्वाचा मुद्दा आहे. पावसाच्या अनियमिततेमुळे विविध रोग आणि किडींचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असते. सोयाबीनवरील खोडमाशी, कापसावरील गुलाबी बोंडअळी, तुरीवरील शेंगा पोखरणारी अळी, भातावरील करपा रोग यांसारख्या समस्यांमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होते. अशा वेळी एकात्मिक पीक संरक्षण व्यवस्थापनाचा अवलंब करणे आवश्यक ठरते. रोग आणि किडींची लक्षणे वेळेत ओळखणे, जैविक नियंत्रण साधनांचा वापर करणे, फेरपालट पद्धतीचा अवलंब करणे आणि आवश्यकता असेल तेव्हाच शिफारशीनुसार रासायनिक कीटकनाशकांचा वापर करणे, या उपाययोजनांमुळे पीक संरक्षण अधिक परिणामकारक बनते. अनेकदा जाहिरातींच्या प्रभावाखाली येऊन शेतकरी अवाजवी प्रमाणात औषधांचा वापर करतात. त्यामुळे उत्पादन खर्च वाढतो, पर्यावरणीय संतुलन बिघडते आणि मातीच्या गुणवत्तेवरही विपरीत परिणाम होतो. कृषी तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली योग्य निर्णय घेणे अधिक हितावह ठरते. आजच्या काळात कृषी सल्लागारांची भूमिका अत्यंत महत्त्वाची बनली आहे. कृषी विद्यापीठे, कृषी विज्ञान केंद्रे, तालुका कृषी अधिकारी, विस्तार अधिकारी आणि विविध संशोधन संस्था या माध्यमातून शेतकऱ्यांना आधुनिक शेतीविषयक माहिती उपलब्ध करून दिली जाते. मोबाईल तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे हवामान अंदाज, बाजारभाव, रोग-किडींची माहिती आणि पीक व्यवस्थापनाचे सल्ले शेतकऱ्यांपर्यंत सहज पोहोचू लागले आहेत. तथापि, माहितीची विश्वासार्हता आणि तिचा योग्य वापर याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. कृषीविषयक निर्णय घेताना प्रमाणित स्रोतांवर आधारित माहितीचा वापर करणे ही आजच्या शेतकऱ्याची गरज बनली आहे.

शासनाच्या विविध योजनाही शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरतात. प्रधानमंत्री पीक विमा योजना, मृदा आरोग्य पत्रिका योजना, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान, कृषी यांत्रिकीकरण योजना आणि विविध राज्यस्तरीय अनुदान योजना यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जात आहे. पीक विमा योजना ही नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या नुकसानापासून संरक्षण देणारी महत्त्वाची योजना मानली जाते. मात्र, विमा नोंदणी, नुकसान भरपाईचे मूल्यांकन आणि दाव्यांच्या निकाली प्रक्रियेमध्ये अधिक पारदर्शकता आणि गती आणण्याची अपेक्षा शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जाते. शासनाच्या योजना केवळ कागदोपत्री न राहता त्यांचा लाभ प्रत्यक्ष गरजू शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणे अत्यंत आवश्यक आहे.

शेतकऱ्यांसमोरील आर्थिक आव्हाने ही आज गंभीर चिंतेची बाब ठरली आहे. बियाणे, खते, कीटकनाशके, मजुरी आणि इंधन यांच्या वाढत्या किमतींमुळे उत्पादन खर्चात मोठी वाढ झाली आहे. दुसरीकडे शेतीमालाला मिळणारा भाव अनेकदा अपेक्षेपेक्षा कमी असतो. बाजारपेठेतील चढ-उतार, मध्यस्थांची भूमिका आणि साठवणुकीच्या मर्यादित सुविधा यांमुळे शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचा योग्य मोबदला मिळण्यात अडचणी येतात. कर्जबाजारीपणा ही अनेक शेतकरी कुटुंबांसमोरील वास्तव परिस्थिती बनली आहे. अशा वेळी शाश्वत शेती व्यवस्थापन, उत्पादन खर्चात बचत आणि मूल्यवर्धनाच्या संधींचा शोध घेणे आवश्यक ठरते.

शेतीशी संबंधित सामाजिक आव्हानेही तितकीच गंभीर आहेत. ग्रामीण भागातून शहरांकडे होणारे स्थलांतर, शेतीकडे कमी होत चाललेला तरुणांचा कल, लहान होत जाणारी जमीनधारणा आणि कौटुंबिक जबाबदाऱ्यांचे वाढते ओझे यांचा शेती क्षेत्रावर परिणाम होत आहे. आज अनेक शेतकरी कुटुंबांमध्ये महिलांचा शेतीतील सहभाग मोठ्या प्रमाणात वाढला आहे. पेरणीपासून काढणीपर्यंत विविध कामांमध्ये महिला महत्त्वाची भूमिका बजावत असल्या, तरी त्यांचे योगदान अनेकदा दुर्लक्षित राहते. महिलांना प्रशिक्षण, आर्थिक सक्षमीकरण आणि निर्णय प्रक्रियेमध्ये समान सहभाग मिळणे आवश्यक आहे.

शेतकरी उत्पादक कंपन्या आणि स्वयं-सहाय्यता गट हे ग्रामीण विकासाचे प्रभावी माध्यम ठरू शकतात. सामूहिक खरेदी, सामूहिक विक्री आणि तांत्रिक सल्ल्याच्या माध्यमातून लहान शेतकऱ्यांनाही स्पर्धात्मक बाजारपेठेत टिकून राहण्याची संधी मिळू शकते. एकट्याने संघर्ष करण्यापेक्षा समूहाच्या माध्यमातून पुढे जाण्याची मानसिकता विकसित होणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील युवकांनी कृषी उद्योजकतेकडे वळल्यास शेती क्षेत्रात नवे बदल घडू शकतात.

हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर पीक विविधीकरणालाही महत्त्व प्राप्त झाले आहे. एकाच पिकावर अवलंबून राहण्याऐवजी विविध पिकांची लागवड, आंतरपीक पद्धती, पशुपालन, मत्स्यपालन आणि पूरक व्यवसायांचा अवलंब केल्यास उत्पन्नाचे विविध स्रोत निर्माण होऊ शकतात. त्यामुळे जोखीम कमी होते आणि आर्थिक स्थैर्य वाढण्यास मदत होते. पारंपरिक ज्ञान आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांचा समन्वय साधून स्थानिक परिस्थितीनुसार शेती पद्धती विकसित करणे ही भविष्यातील गरज आहे.

पेरणीसाठी योग्य वेळ निश्चित करणे ही केवळ तांत्रिक बाब नसून ती शेतकऱ्यांच्या जीवनाशी निगडित प्रक्रिया आहे. योग्य वेळी घेतलेला निर्णय उत्पादन वाढवू शकतो, तर चुकीच्या वेळेवर केलेली पेरणी मोठ्या आर्थिक नुकसानीस कारणीभूत ठरू शकते. त्यामुळे हवामान अंदाज, जमिनीतील ओलावा, बियाण्यांची उपलब्धता आणि संसाधनांची तयारी या सर्व बाबींचा विचार करूनच पेरणी करणे आवश्यक आहे. कृषी तज्ज्ञांच्या मते, संयम आणि नियोजन या दोन गोष्टी खरीप हंगामातील यशस्वी शेतीचे मूलमंत्र आहेत.

महाराष्ट्रातील शेतकरी अनेक संकटांना तोंड देत असतानाही नव्या उमेदीने शेती करीत आहे. नैसर्गिक आपत्ती, आर्थिक अडचणी आणि सामाजिक बदल यांच्या छायेतही त्याची जिद्द अबाधित आहे. प्रत्येक खरीप हंगाम हा त्याच्यासाठी नव्या आशांचा, नव्या शक्यतांचा आणि नव्या संघर्षांचा प्रवास असतो. पावसाच्या पहिल्या सरी जमिनीला जशा नवसंजीवनी देतात, तशाच त्या शेतकऱ्यांच्या मनातही नव्या विश्वासाची पालवी फुलवतात.

आज आवश्यकता आहे ती शेतीकडे केवळ उपजीविकेचे साधन म्हणून न पाहता, ती एक महत्त्वपूर्ण राष्ट्रीय जबाबदारी म्हणून स्वीकारण्याची. अन्नसुरक्षा, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि सामाजिक स्थैर्य यांचा पाया शेतीवरच उभा आहे. शेतकऱ्यांना सक्षम बनविण्यासाठी शासन, संशोधन संस्था, समाज आणि ग्राहक यांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांच्या श्रमांचा सन्मान करीत त्यांना आवश्यक सुविधा, योग्य बाजारपेठ आणि तांत्रिक मदत उपलब्ध करून देणे ही काळाची मागणी आहे. पावसाच्या चाहुलीत सुरू होणारे पेरणीचे नियोजन हे केवळ कृषी व्यवस्थापनाचे काम नसून ते भविष्य घडविण्याचे कार्य आहे. बदलत्या वातावरणाशी जुळवून घेत, नव्या तंत्रज्ञानाचा स्वीकार करीत आणि पारंपरिक ज्ञानाची सांगड घालत महाराष्ट्रातील शेतकरी अधिक सक्षम होऊ शकतो. संकटे कितीही मोठी असली, तरी नियोजन, दूरदृष्टी आणि सामूहिक प्रयत्न यांच्या बळावर त्यांच्यावर मात करता येते. शेवटी, योग्य नियोजन, हवामानाची अचूक माहिती आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांच्या आधारे शेतकरी संकटांवर मात करू शकतो, हा विश्वास अधिक दृढ करण्याची हीच वेळ आहे. कारण शेतकऱ्याचा आशावाद, त्याची जिद्द आणि श्रमशीलता यांच्याच बळावर देशाची अन्नसुरक्षा आणि समृद्धी अवलंबून आहे.

**– डॉ. राजेंद्र बगाटे**

# विराट कोहली : ब्रँड व्हॅल्यू, नंबर वन

भारतीय क्रिकेट मधील धुरंधर खेळाडू विराट कोहली हा भारतातील सर्वात मौल्यवान सेलिब्रिटी असून त्याचे अंदाजित ब्रँडमूल्य ३५४२ कोटी रुपये इतके आहे. फॉर्च्यून, इंटर ब्रँड रिपोर्टनुसार देशातील प्रमुख पंचवीस सेलिब्रिटीमध्ये विराट कोहली आघाडीवर आहे.

ब्रँड व्हॅल्यू ची ही क्रमवारी बॉक्स ऑफिस वरील यश, खेळामधील सर्वोत्तम कामगिरी जागतिक सोशल मीडिया प्रभाव, बहुराष्ट्रीय जाहिरात करार यांचा एकत्रित विचार करून ठरविण्यात येते.

भारतातील १० सेलिब्रिटींचे ब्रँड मूल्य पुढील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | विराट कोहली | ३५४२ |
| २) | शाहरुख खान | ३०१७ |
| ३) | प्रियांका चोपडा | २५०७ |
| ४) | एम एस धोनी | २१४१ |
| ५) | रणवीर सिंग | २०७७ |
| ६) | अक्षय कुमार | २०६४ |
| ७) | अमिताभ बच्चन | १९३३ |
| ८) | सचिन तेंडुलकर | १६७६ |
| ९) | आलिया भट्ट | १६०६ |
| १०) | दिलजीत दोसांझ | १४९७ |




**ब्रँड व्हॅल्यू कशी काढली जाते**

सेलिब्रिटी यांची ब्रँड व्हॅल्यू ही केवळ त्यांची संपत्ती किंवा समाज माध्यमांवरील फॉलोअर्सची संख्या नसून, ती त्यांच्या व्यावसायिक कमाई, लोकांचा त्यांच्यावरील विश्वास आणि ब्रँड एन्डोर्समेंट म्हणजेच जाहिरातीच्या माध्यमातून त्यांना मिळालेले उत्पन्न या घटकांवर मोजली जाते. ही मूल्य गणना करण्यासाठी खालील महत्वाचे निकष वापरले जातात.

**१) इंडोर्समेंट फी आणि कमाई –** सेलिब्रिटी एका जाहिरातीसाठी किंवा एका दिवसाला किती मानधन घेतात, त्यांच्या सध्याच्या किती ब्रँड पार्टनरशिप्स आहेत म्हणजेच किती उत्पादनांसाठी ते जाहिराती करतात यावरून त्यांची आर्थिक कमाई तपासली जाते.

**२) ब्रँड इक्विटी आणि प्रभाव –** ते लोकांच्या जीवनावर आणि खरेदीच्या निर्णयावर किती प्रभाव पाडू शकतात याचा अभ्यास करण्यात येतो.

प्रभावाचा हा अभ्यास 'इंटर ब्रँड' आणि 'डफ एंड फेब्ज ' सारख्या आंतरराष्ट्रीय नामांकित सल्लागार संस्था करतात.

**३) लोकांचा विश्वास आणि प्रतिमा–** सेलिब्रिटीची जनमानसातील प्रतिमा कशी आहे, ते किती विश्वासार्ह आहेत, त्यांच्या संबंधात कोणते मोठे वाद किंवा कायदेशीर जोखीमा आहेत का याचे मूल्यमापन केले जाते.

**४) समाज माध्यमांवरील अस्तित्व–** सेलिब्रिटी चा समाज माध्यमांवर कोणत्या प्रकारचा प्रभाव आहे हे तपासले जाते. यामध्ये केवळ फॉलोअर्सची संख्या न बघता त्यांच्या पोस्टवर त्यांचे चाहते किती प्रतिक्रिया देतात (लाईक्स, कॉमेंट्स, शेअर ) समाज माध्यमांवर ते किती सक्रिय आहेत याचा अभ्यास करण्यात येतो.

**५) भविष्यातील कमाईचा अंदाज –** सध्याच्या लोकप्रियतेनुसार भविष्यात ते किती ब्रँड्स सोबत काम करू शकतील याचा अंदाज बांधण्यात येतो. यावरून त्यांच्या कमाई बद्दल अंदाज बांधण्यात येतो. वरील सर्व घटकांचा एकत्रित रित्या अभ्यास करून अंतिम निकष ठरविण्यात येतात. वरील यादीमध्ये प्रामुख्याने क्रिकेटपटू, सिनेमा अभिनेते यांचा समावेश होतो. यांच्या लोकप्रियतेचा, व्यावसायिक प्रतिमेचा, जनमानसावर मोठा प्रभाव असतो. या प्रतिमेचा वापर करूनच जाहिरातीसाठी त्यांचे बाजार मूल्य ठरते.

या यादीकडे बघितल्यास, आपापल्या क्षेत्रात सर्वोत्तम कामगिरी करणारे, अमिताभ बच्चन सारखे वयाने ज्येष्ठ परंतु समाजामध्ये प्रतिष्ठा असलेले कलावंत आणि खेळाडू आढळतात. हे बाजार मूल्य सातत्याने टिकवण्यासाठी आपापल्या क्षेत्रात उत्तम कामगिरी असणे गरजेचे आहे. सातत्य हा याचा पाया आहे. चांगल्या कामगिरीतून झालेली कमाई या पद्धतीने ब्रँड व्हॅल्यू कडे पाहण्यात यावे.

**– डॉ. अभय मंडलिक**

# विरंगुळा केंद्राबाबत ज्येष्ठ नागरिकांचे नगरसेविका अनिता काटे यांना निवेदन



पुणे, दि. १२ (प्रतिनिधी) – परिसरातील ज्येष्ठ नागरिक माझ्यासाठी नेहमीच मार्गदर्शक आहेत. त्यांचे हित जपण्यासाठी तसेच त्यांच्या अडचणी सोडविणे हे माझे प्रथम कर्तव्य असून त्यांना विरंगुळा केंद्र मिळवून देण्यासाठी मी प्राधान्य देईन असे आश्वासन नगरसेविका अनिता काटे यांनी दिले.

स्मार्ट सिटी अंतर्गत विकसित होत असलेल्या पिंपळे सौदागर प्रभागात ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र उभारणी बाबत येथील ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनच्या वतीने प्रभागाच्या नगरसेविका अनिता काटे यांना निवेदन देण्यात आले. त्यावेळी त्या बोलत होत्या. पिंपळे सौदागर परिसरात सद्यस्थितीत सहा ज्येष्ठ नागरिक संघटना कार्यरत असून महिला – पुरुष मिळून दिड हजारांपेक्षा जास्त सदस्यसंख्या आहे.

या सर्व संघटना 'पिंपरी चिंचवड ज्येष्ठ नागरिक महासंघाशी' संलग्न असून महानगरपालिकेच्या वतीने या संघटनांना दरवर्षी विविध स्वरूपात भेटवस्तू मिळतात. परंतु विरंगुळा केंद्र नसल्याने त्या ठेवायच्या कुठे हा प्रश्न संघटनांच्या पदाधिकाऱ्यांपुढे आहे. मनपाने दिलेल्या भेटवस्तू सुरक्षित ठेवण्यासाठी तसेच ज्येष्ठ नागरिकांना उतारवयात एकत्र येऊन सुख दुःखाच्या चार गोष्टी करण्यासाठी विरंगुळा केंद्र उपलब्ध करुन देण्यात यावे तसेच परिसरातील सांस्कृतिक चळवळ वाढीस लागण्यासाठी नाट्यगृहाची उभारणी करण्यात यावी अशी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. सुभाषचंद्र पवार तसेच विवेकानंद लिगाडे, अशोक येळंमकर, सुभाष विधाते, रमेश चांडगे, सुभाष पाटील, अशोक कलाल, निर्मला कासार, भामिनी महाले, रमेश वाणी या पदाधिकाऱ्यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

# ऑपरेशन अमानतअंतर्गत आरपीएफ नांदेड विभागाने में-२०२६ पर्यंत प्रवाशांचा रू. २२.६० लाख किमतीचा हरवलेला माल/ सामान / वस्तू परत केला

नांदेड, दि. १२ (प्रतिनिधी) – रेल्वे सुरक्षा बल (RPF), नांदेड विभागाने 'ऑपरेशन अमानत' अंतर्गत हरवलेल्या व बेवारस अवस्थेत आढळलेल्या प्रवाशांच्या मालमत्तेचा शोध घेऊन ती त्यांच्या मूळ मालकांना परत करण्याची आपली प्रवासी सेवा व सुरक्षेबाबतची बांधिलकी पुन्हा एकदा सिद्ध केली आहे.

सन २०२६ मध्ये मे महिन्यापर्यंत, नांदेड विभागातील आरपीएफने एकूण ६७ प्रकरणांमध्ये हरवलेल्या मालमत्तेचा शोध घेऊन ती संबंधित प्रवाशांना यशस्वीरित्या परत केली. परत करण्यात आलेल्या मालमत्तेची एकूण किंमत रू. २२,६०,२८६ /- इतकी आहे. या मालमत्तेमध्ये मोबाईल फोन, लॅपटॉप, दागिने, रोख रक्कम, हँडबॅग, प्रवासी सामान, महत्त्वाची कागदपत्रे तसेच इतर मौल्यवान वैयक्तिक वस्तूंचा समावेश होता. रेल्वे प्रवासादरम्यान या वस्तू हरवणे, विसरणे किंवा चुकून मागे राहणे अशा विविध कारणांमुळे त्या प्रवाशांपासून दूर झाल्या







होत्या. आरपीएफ कर्मचाऱ्यांच्या तत्पर कार्यवाही, सखोल पडताळणी आणि समर्पित प्रयत्नांमुळे या सर्व वस्तू सुरक्षितपणे त्यांच्या वास्तविक मालकांपर्यंत पोहोचविण्यात आल्या.

'ऑपरेशन अमानत' ही रेल्वे सुरक्षा बलाची एक महत्त्वपूर्ण प्रवासी-केंद्रित योजना असून, रेल्वे प्रवासादरम्यान हरवलेल्या वस्तूंची पुनर्प्राप्ती करून त्या संबंधित प्रवाशांना त्वरित परत मिळवून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. भारतीय रेल्वेच्या विस्तृत जाळ्यावर सुरक्षित, विश्वासार्ह आणि प्रवासी-अनुकूल वातावरण निर्माण करण्याच्या आरपीएफच्या वचनबद्धतेचे हे प्रतीक आहे. या उपक्रमांतर्गत मिळालेले सातत्यपूर्ण यश हे आरपीएफ कर्मचाऱ्यांच्या सतर्कता, व्यावसायिकता आणि कर्तव्यनिष्ठेचे द्योतक आहे. हरवलेल्या मालमत्तेचा शोध घेऊन ती प्रवाशांना परत देण्यामुळे संबंधित प्रवाशांना मोठा दिलासा मिळतोच, शिवाय रेल्वे सुरक्षा बलाविषयीचा जनतेचा विश्वासही अधिक दृढ होतो. प्रवाशांनी रेल्वे प्रवासादरम्यान आपल्या सामानाबाबत सतर्क राहावे तसेच कोणतीही वस्तू हरवल्यास किंवा बेवारस सामान आढळल्यास त्वरित जवळच्या आरपीएफ पोस्टशी संपर्क साधावा. तसेच रेल्वे हेल्पलाईन क्रमांक १३९ अथवा आरपीएफच्या अधिकृत सुरक्षा सहाय्य मंचांद्वारे माहिती देऊन तत्काळ मदत घ्यावी. रेल्वे सुरक्षा बल, नांदेड विभाग प्रवाशांची सुरक्षा, संरक्षा आणि उत्कृष्ट सेवा सुनिश्चित करण्यासाठी कटिबद्ध असून, रेल्वे प्रवास अधिक सुरक्षित, विश्वासार्ह आणि प्रवासी-अनुकूल बनविण्यासाठी भविष्यातही समर्पित भावनेने कार्यरत राहील.

# अयोध्येपासून राष्ट्रापर्यंत: भगवान श्रीरामांच्या जिवंत रक्तरेषेला राष्ट्रव्यापी समर्थन

**भारताच्या** सभ्यता आणि संस्कृतीचा केंद्रबिंदू भगवान श्रीराम आहेत. मर्यादा, धर्म आणि आदर्श शासनाचे प्रतीक. शतकानुशतके रामायण हे केवळ ग्रंथ राहिलेले नाही, तर जीवनाची प्रेरणा राहिले आहे. आज इतिहास आणि परंपरेचा हा प्रवाह एका नवा टप्प्यावर पोहोचला आहे. श्री अजय हरिनाथ सिंह, त्यांच्या कुलगुरु जगद्गुरु रामभद्राचार्यजी यांच्या प्रमाणासह, भगवान श्रीरामांच्या पुत्र लवकुळापासून आलेल्या १००% जिवंत रक्तवंशाचे एकमेव वारस म्हणून सिद्ध झाले आहेत.

ही मान्यता आता फक्त वंशावळीत मर्यादित राहिलेली नाही तर तिला राजकीय स्वीकृती आणि समर्थन देखील लाभले आहे. उत्तर प्रदेश, हरियाणा आणि महाराष्ट्राचे समर्थन या तीन राज्यांचे उत्तर प्रदेश, हरियाणा आणि महाराष्ट्र मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी या वंशपरंपरेला औपचारिक समर्थन, स्वीकृती आणि मान्यता दिली आहे. उत्तर प्रदेश, जिथे अयोध्या आणि श्रीराम जन्मभूमी आहे, त्यांनी या जिवंत परंपरेला मान्यता देऊन ऐतिहासिक जबाबदारी पार पाडली. हरियाणा, जे धर्म आणि पराक्रमाची भूमी आहे, त्यांनी पूर्ण समर्थन दिले आणि संदेश दिला की धर्म व परंपरेचे रक्षण आजही सर्वोच्च आहे.

महाराष्ट्र, जिथे छत्रपती शिवाजी महाराज आणि समर्थ रामदास स्वामी यांनी धर्म आणि संस्कृतीचे रक्षण केले, तेथील सरकारनेही या याचिकेला समर्थन देऊन परंपरा आणि राजकारणाचा संगम घडवून आणला.

**गुरुची भूमिका: जगद्गुरु रामभद्राचार्यजी–** सनातन परंपरेत वंश रक्ताने पूर्ण होत नाही, तर गुरुच्या कृपेने पूर्ण होतो. जगद्गुरु रामभद्राचार्यजी यांनी स्वतः श्री अजय हरिनाथ सिंह यांना भगवान श्रीरामांचा जिवंत रक्तवंश घोषित केले आहे.

**जीवंत रामायण–** श्री अजय हरिनाथ सिंह, आपल्या गुरुंच्या मार्गदर्शनाखाली, केवळ एक व्यक्ती नाहीत तर जीवंत रामायण आहेत. त्यांचे जीवन सत्य, करुणा, विनम्रता आणि धर्माच्या आदर्शांवर आधारलेले आहे.

**निष्कर्ष–** सर्वोच्च न्यायालयातील ही PIL आता फक्त एक याचिका नाही, ती एक राष्ट्रीय चळवळ बनली आहे. उत्तर प्रदेश, हरियाणा आणि महाराष्ट्राच्या नेतृत्वाच्या समर्थनासह आणि जगद्गुरु रामभद्राचार्यजींच्या प्रमाणिकतेसह, यात आता काहीही शंका नाही की श्री अजय हरिनाथ सिंह हे भगवान श्रीरामांच्या १००% जिवंत रक्तरेषेचे एकमेव वारस आहेत.

## कर्मचाऱ्यांची कपात करत AI वर वारेमाप पैसे उधळले!

# आर्थिक घडी विस्कटल्याने कंपन्यांसमोर उभे ठाकले नवे प्रश्न

**जगातील** प्रमुख टेक कंपन्यांमध्ये सध्या एक मोठा बदल होत आहे. कंपन्या कृत्रिम बुद्धिमत्तेवर मोठ्या प्रमाणात खर्च करत असताना, कर्मचारी गळतीचे प्रमाणही वेगाने वाढत आहे. अनेक कंपन्यांमध्ये कर्मचारी कपात करत अख वर मोठ्या प्रमाणात खर्च होत असल्याने कर्मचाऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. त्यामुळे आता अख मुळे समस्या खरोखर कमी होत आहेत की नव्या समस्या उभ्या ठाकत आहेत, अशी चर्चा होत आहे.

कंपन्या कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकत आहेत आणि कर्मचाऱ्यांपेक्षा एआयवर जास्त खर्च करत आहेत. मात्र, कृत्रिम बुद्धिमत्ता सध्या अनेक कंपन्यांवर उलटत आहे. एकीकडे त्या कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकत आहेत, तर दुसरीकडे त्या कर्मचाऱ्यांपेक्षा एआयवर जास्त पैसे गुंतवत आहेत. अनेक कंपन्यांनी हे मान्य केले आहे की एआयसाठीचे त्यांचे वार्षिक बजेट एकाच महिन्यात संपत आहे. त्यामुळे कंपन्यांसमोर आर्थिक गणीत जुळवण्यासोबत अनेक नव्या समस्या उभ्या ठाकत आहेत.

अलीकडील अहवालानुसार, अनेक कंपन्या आता एआयवर प्रति कर्मचारी प्रति महिना ६.४ लाख पर्यंत खर्च करत आहेत. यामध्ये एआय टूल्स, क्लाउड सर्व्हिसेस, डेटा प्रोसेसिंग आणि कॉम्प्युटिंग पॉवरच्या खर्चाचा समावेश आहे. कंपन्यांचे लक्ष माणसांकडून यंत्रांकडे वळत आहे. त्यामुळे कर्मचारी कपातीचे एआय हे एक प्रमुख कारण बनले आहे. अहवालानुसार, अमेरिकेत कर्मचारी कपातीचे सर्वात मोठे कारण एआय बनत आहे. २०२६ मध्ये एआय-संबंधित कर्मचारी कपातीची संख्या गेल्या दोन वर्षांतील एकूण कर्मचारी कपातीच्या संख्येपेक्षा आधीच जास्त झाली आहे. अनेक मोठ्या कंपन्यांनी आपला कर्मचारी वर्ग कमी केला आहे आणि तेच बजेट एआय पायाभूत सुविधांमध्ये गुंतवले आहे. याचा अर्थ असा की, कंपन्यांना आता कमी लोकांमध्ये अधिक काम करायचे आहे.

एआय आता कंपन्यांसाठी एक दीर्घकालीन गुंतवणूक बनली आहे. एकदा प्रणाली तयार झाली की, ती सतत काम करते, थकत नाही आणि मोठ्या टीमची गरज कमी होते. पूर्वी कंपनीला ग्राहक सेवेसाठी एक मोठी टीम ठेवावी लागत होती, ते काम आता एआय चॅटबॉट्सद्वारे केले जात आहे. डेटा विश्लेषणातही एआयचा वापर वेगाने वाढत आहे. यामुळेच कंपन्या कर्मचाऱ्यांच्या पगारावर खर्च करण्याऐवजी एआय प्रणालींमध्ये गुंतवणूक करत आहेत.

या बदलाचा सर्वात मोठा परिणाम नोकरदार लोकांवर होत आहे. सुरुवातीच्या आणि मध्यम स्तरावरील नोकऱ्या विशेषतः धोक्यात आहेत. भविष्यात फक्त तेच लोक टिकतील ज्यांना एआयसोबत काम कसे करायचे हे माहित आहे. याचा अर्थ असा की, आता केवळ कौशल्येच नव्हे, तर एआय सोबत कसे काम करायचे हे समजून घेणे देखील आवश्यक ठरेल.

ज्या कंपन्यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेमध्ये (आर्टिफिशियल इंटेलिजन्स) गुंतवणूक करण्यास आधीच सुरुवात केली होती, त्या आता मागे हटत आहेत. याचे कारण असे की, एआय माणसांपेक्षा जास्त खर्चाने कामे करत आहे. उबर आणि मायक्रोसॉफ्टसह अनेक कंपन्यांनी हे मान्य केले आहे की, एआयची बिले भरणे अधिकाधिक ओझे बनत आहे. एआय विनामूल्य काम करत नाही आणि त्यासाठी क्रेडिट्सची आवश्यकता असते. कॉर्पोरेट स्तरावर, लाखो क्रेडिट्स कधीकधी एका महिन्यातच संपून जातात. अनेक कंपन्या त्यांचे वार्षिक एआय बजेट एकाच महिन्यात संपवत आहेत. त्यामुळे त्यांचे आर्थिक गणीत बिघडले आहे. ज्या कंपन्यांनी नुकतेच एआयचा अवलंब करण्यास सुरुवात केली आहे, त्या वेगाने लोकांना कामावरून काढून टाकत असल्या तरी, तज्ञांचा असा विश्वास आहे की काही वर्षांत, एआय अधिकाधिक महाग होत असल्याने कंपन्या पुन्हा माणसांना कामावर ठेवण्याकडे वळतील. एआय कंपन्यांसाठी एक संधी आणि आव्हान दोन्ही सादर करते. एकीकडे ते काम सोपे आणि जलद करत आहे, तर दुसरीकडे ते काम करण्याच्या पद्धतीत पूर्णपणे बदल घडवत आहे.

# बालमजुरी निर्मूलनासाठी सर्वंकष प्रयत्न करा !

**देशातील** बालके ही राष्ट्राची अनमोल राष्ट्रीय संपत्ती आहे. आजची बालके ही उद्याची देशाची अनमोल मालमता असणार आहे.मात्र या राष्ट्रीय संपत्ती कडे समाजातील व देशातील सर्व घटकांचे दुर्लक्ष आहे. आज देशात हॉटेल, वीटभट्टी, कापड दुकान, शेतीत या बालकांना कामाला लावून त्यांचे बालपण हिरावून घेतल्या जात आहे. घटनेत १४वर्षापर्यंतच्या बालकांना मोफत शिक्षण आहे. शिक्षण घेणे व शासनाने बालकांना शिक्षण देणे हा बालकांचा घटनात्मक अधिकार असतांना दुकानदार, वीट भट्टी मालक, कारखानदार,हॉटेल चालक बालकांना कामाला लावून त्यांचे हक्क हिरावून घेत आहेत.

बालमजुरी ही राष्ट्रीय विकासाला आणि माणुसकीला ही कलंक आहे. बालमजुरी बालकांना त्यांच्या हक्कापासून वंचित ठेवणारी तसेच त्यांच्या शारीरिक, मानसिक, भावनिक व बौध्दिक विकासाला बाधा आणणारी आहे. बालमजुरी करायला लावणे व मालकांनी बालमजुरांना कामाला लावणे हा गुन्हा असतानाही देशात सर्रास बालमजुरी प्रथा चालू आहे. काही कुटुंबाची मजबुरी असेल, त्यांना बालमजुरी शिवाय पर्याय नसेल असे एखाद-दोन कुटुंब अपवाद असू शकतात. देशातील बालमजुरी प्रथा म्हणजे एक प्रकारचे बालकांचे शोषणच होय.

बालकांचे किशोरावस्थेपर्यंत कौतुक हवे, त्यांना लाड व प्रेम, स्नेह, आपुलकी हवी, त्याना त्यांच्या मनाप्रमाणे खेळू व बागडू द्यायला हवे,त्यांचे आरोग्य उत्कृष्ट राहावे, त्यांचे संगोपन, संरक्षण व संवर्धन योग्य प्रकारे झाल्यास ते उद्याची या देशाची सूत्रे योग्य प्रकारे सांभाळू शकतात, स्वतःचा योग्य सर्वांगीण विकास घडवून आणू शकतात,त्यांना बालमजुरी साठी जुंपणे योग्य नाही. ६ ते १४ वयोगटातील मुलां-मुलींना घरात, हाटेलात किंवा वीट भट्टीवर,कारखान्यात, दुकानात कामावर ठेऊ नये, असे आढळल्यास पोल आढळल्यास पोलीसानी तात्काळ संबंधित मालकावर गुन्हा दाखल करावा.

६ ते १४ वयोगटातील मुले-मुलीं शाळेत टिकवून राहावेत म्हणून शिक्षकांनी आपले अध्ययन-अध्यापन दर्जेदार ठेवावे, म्हणजे मुलं अर्ध्यावर शाळा सोडणार नाहीत.सामाजिक संस्था मंडळे, वस्तीगृहे, अधिकारी व लोकप्रतिनिधी यांनीही गरीब मुलांना दत्तक घेऊन त्यांचे पालकत्व स्वीकारले पाहिजे. शासनाने ही बालकांसाठीच्या योजना, सोयी, सवलती त्यांच्या पर्यंत पोहचवून बालकांना बालमजूर होण्यापासून रोखले पाहिजे.

**– धोंडीरामसिंह राजपूत**

# बालपणीच्या आठवणींचा अमिट ठेवा

**आपल्या** वयाच्या मधल्या कालखंडातील घटनांपेक्षा आपल्याला आपल्या बालवयातील म्हणजेच साधारण प्रायमरी वयोगटातील घटना, मित्र, शाळा, शिक्षक हे जरा जास्त पक्के लक्षात राहतात. बऱ्याच जणांचा हा अनुभव असतो की मूल वयाच्या आठ, दहा वर्षात जे घडलं ती खरी पक्की जडणघडण असते. म्हणूनच बहुतेकांना ते मित्र, ती शाळा, ते शिक्षक हे नंतरच्या आयुष्यात आलेल्या ह्याच गोष्टींपेक्षा जास्त लक्षात राहतात. अस म्हणतात माती ओली असतानाच सुबक चांगला आकार प्राप्त होतो तसेच अगदी आपल्या आयुष्याचे आणि जीवनाचे सुद्धा असते.

मला अजूनही मी प्रायमरी इयत्ता शिकलेल्या शाळेतील प्रार्थना खूप आवडते आणि म्हणून ती अजूनही जशीच्या तशी आठवते सुद्धा. ती प्रार्थना होती ' खरा तो एकची धर्म ' . ही लिहिलीय साने गुरुजी ह्यांनी. ही प्रार्थना आणि तिचा अर्थ ह्याची आज परत एकदा सानेगुरुजींच्या स्मृतीदिनी उजळणी. जगात अनेक धर्म, पंथ किंवा जाती असल्या तरी, सर्वांवर निस्वार्थ प्रेम करणे आणि एकमेकांना मदत करणे हाच खरा धर्म आहे. दीन-दुबळ्यांना आधार: जे लोक समाजाच्या प्रवाहात मागे पडले आहेत, दुःखी आहेत किंवा संकटात आहेत, त्यांना मदतीचा हात देणे, धीर देणे आणि त्यांच्या चेहऱ्यावर हसू आणणे हेच माणसाचे कर्तव्य आहे. १. सर्वसमभाव: या जगातली सर्व माणसे ईश्वराची लेकरे आहेत. त्यामुळे कोणीही लहान-मोठा किंवा तुच्छ नसून, सर्वांना समान बंधू मानावे हीच या प्रार्थनेची शिकवण आहे. २. सद्गुणांचा प्रसार: आपल्याकडे असलेली विद्या, संपत्ती किंवा ज्ञान इतरांना वाटून अज्ञानाचा अंधकार दूर करावा आणि जगात आनंदाचा प्रकाश पसरावा. ह्या प्रार्थनेचे सार माणसाला संकुचित भेदभावातून बाहेर काढून सहानुभूती, प्रेम आणि समाजसेवेचा मार्ग दाखवते.

'खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे' ही प्रार्थना जितकी सुंदर तितकाच त्याचा अर्थही सुंदर. प्रायमरी शाळेत असताना मनापासून ही प्रार्थना म्हणताना कशी, आणि कधी मेंदूत जाऊन घट्ट रुजली ते कळलच नाही. हया आदर्शवान देवमाणसाचा शेवट अशा पद्धतीनं व्हावा हे एक न उलगडणारे कोडेच. काही प्रश्नांची उत्तरे ही कदाचित कधीच मिळत नाहीत हेच खरे. हे प्रश्न एक कायमची रुखरुख लावून आपल्या मनात ठाण मांडून बसतात. आज ११ जुन.आज सानेगुरुजीचा स्मृतिदिन. हा दिवस येतानाच मुळी दुहेरी चटका लावून येतो. आपल्या समाजाला नितांत गरज असताना गुरुजींचे आपल्यातून कायमचे जाणे आणि ते मरण ही त्यांनी स्वतःच्या हातांनी,मनानी निवडलेले. त्यांनी कुठल्यातरी कारणाने हा टोकाचा निर्णय घेतला असावा. कारण त्यांचं मन अतिशय भावनाप्रधान व संस्कारक्षम होते आणि स्वभाव अतिशय भिडस्त

नंतरनंतर वाचनाची आवड लागली. मग दर्जेदार वाचन म्हणजे नेमके काय ही पण अक्कल आली. हया काळात काही पुस्तकं ही पार मेंदूचा एक कप्पा अडवून, मनाच्या खोल गाभाऱ्यात जाऊन कधी आणि कशी विराजमान झालीत हे ही कळलं नाही. त्यापैकीच एक पुस्तक 'श्याम ची आई'. हे पुस्तक अजिबात आंधळ नसलेलं नात्यातील प्रेम कसं असतं ह्याची नेमकी जाणीव करुन देत. जबादारीने वागणे ,त्या त्यागातील समाधान, परस्परांवरील विश्वास, आणि आदर्श जीवनशैली कशी जगावी हे परफेक्ट शिकवत.

गुरुजींचे एम. ए. पर्यंतचे शिक्षण खरतर तसे हलाखीच्या परिस्थितीत झाले.१९३० पर्यंत त्यांची विद्यार्थी दशा आटोपून सत्याग्रहात भाग घ्यायचं ठरविलं. विनोबा भावे ह्यांचा आदर्श. खादी चा वापर ते करीत. त्यांनी विपुल वाङ्मय लिहिले. लेख, कादंबऱ्या, निबंध, काव्य, चरित्रे,नाट्यसंवाद, ई. साहित्याच्या विविध क्षेत्रात त्यांचं लेखन होते. त्यांचं लिखाण साधं, सरळ, सगळ्यांना उमगेल असे होते. साहित्यातील तेजस्वी रत्न म्हणजे श्यामची आई हे पुस्तक. प्रंतियता ही भारताच्या एकत्वाला बाधक ठरणार आहे हा त्यांचा अंदाज असल्याने त्यांनी आंतर भारतीची स्थापना करण्याचे एक महान कार्य हाती घेतलं. रवींद्रनाथ टागोरांच्या शांतिनिकेतन प्रमाणे आपल्या भागातील मुलांसाठी पण अशी सोय असावी ही त्यांची आंतरिक ईच्छा होती. परंतु दैवईच्छा बलियसी हया नुसार त्यांचे कार्य अपूर्ण असतानाच त्यांचे देहावसान झाले. त्यांना शतशः प्रणाम.

**कल्याणी बापट(केळकर)**
**९६०४९४७२५६**

# देवगिरी किल्ल्यावर सारथीची स्वच्छता मोहीम; ४० संशोधक विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

छत्रपती संभाजीनगर, दि. १२ (प्रतिनिधी) – राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) यांच्या वतीने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून त्याअंतर्गत देवगिरी किल्ला परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत सारथीच्या संशोधक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून ऐतिहासिक वारशाच्या जतनासाठी योगदान दिले.

सारथीतर्फे २६ मे ते २५ जून २०२६ या कालावधीत विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. त्याचाच एक भाग म्हणून १ ते ७ जून दरम्यान गड-किल्ले परिसर स्वच्छता उपक्रम हाती घेण्यात आला. व्यवस्थापकीय संचालक महेश पाटील आणि उपव्यवस्थापकीय संचालक सुवर्णा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली ६ जून रोजी देवगिरी किल्ला, दौलताबाद येथे ही मोहीम पार पडली.

या मोहिमेदरम्यान किल्ला परिसरातून सुमारे १० गोणी कचरा संकलित करण्यात आला. त्यामध्ये सुमारे १२ किलो प्लास्टिक पिशव्या व अन्य टाकाऊ वस्तूंचा समावेश होता. दौलताबाद प्रशासनाच्या सहकार्याने संकलित कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्यात आली.

मोहिमेत एकूण ४० पीएच.डी. संशोधक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. राहुल निकम यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांनी सकाळी ६ ते १० या वेळेत स्वच्छता मोहीम यशस्वीपणे राबविली. तसेच सारथीच्या छत्रपती संभाजीनगर विभागीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनीही या उपक्रमात सहभाग नोंदविला.

ऐतिहासिक वारसा स्थळांचे संवर्धन, पर्यावरण संरक्षण आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण करण्याच्या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून स्वागत होत आहे. स्वच्छता मोहिमेमुळे देवगिरी किल्ला परिसर अधिक स्वच्छ आणि पर्यटकांसाठी आकर्षक बनण्यास मदत झाली आहे.

# अफकॉन्सच्या सीएसआर उपक्रमामुळे ९४ कर्करोगग्रस्त बालक व पालकांच्या जीवनात नवी उमेद – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## समाजहितासाठी उद्योग क्षेत्राचे योगदान प्रेरणादायी

मुंबई, दि. १२ (प्रतिनिधी) – अफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडने सामाजिक उत्तरदायित्वातून (सीएसआर) बालरुग्णांसाठी कर्करोग निदान सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. त्यामुळे ९४ बालकांच्या आणि त्यांच्या पालकांच्या जीवनात नवी उमेद जागविण्याचे प्रेरणादायी काम झाले आहे,अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या सुविधेचे कौतुक केले आहे.

अफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडने २०२५-२६ मध्ये शिक्षण, आरोग्य सेवा आणि महिला सक्षमीकरण या क्षेत्रांमध्ये सीएसआरच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविले आहेत. त्यामध्ये शिक्षण क्षेत्राला विशेष प्राधान्य असले तरी आरोग्य क्षेत्रातही महत्वाचे काम केले आहे. देशभरातील कर्करोगाचा संशय असलेल्या बालरुग्णांसाठी तातडीची निदान सुविधा उपलब्ध करून दिली आहे. या उपक्रमाअंतर्गत अफकॉन्सने टाटा मेमोरियल हॉस्पिटलच्या माध्यमातून 'कर्करोगाचा संशयित आजार असलेल्या बालरुग्णांसाठी आपत्कालीन निदान सहाय्य सेवा' या योजनेसाठी ५० लाख रुपयांची आर्थिक मदत केली आहे. या सहाय्यामुळे देशभरातील ९४ बालकांना कर्करोगाचे तातडीने निदान आणि आवश्यक वैद्यकीय तपासण्या उपलब्ध होऊ शकल्या. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, कर्करोगासारख्या गंभीर आजारामध्ये वेळेवर निदान होणे अत्यंत महत्त्वाचे असते. आर्थिक अडचणींमुळे अनेक कुटुंबांना आवश्यक तपासण्या करता येत नाहीत. अशा परिस्थितीत अफकॉन्सने दिलेली मदत केवळ आर्थिक सहाय्य नसून अनेक बालकांच्या उपचार प्रक्रियेला गती देणारी आणि त्यांच्या कुटुंबांना दिलासा देणारी ठरली आहे. शासनाच्या प्रयत्नांना उद्योग क्षेत्राची अशी साथ मिळाल्यास आरोग्य, शिक्षण आणि सामाजिक विकासाची उद्दिष्टे अधिक वेगाने साध्य होऊ शकतात. म्हणूनच समाजातील दुर्बल घटकांच्या उन्नतीसाठी सार्वजनिक आणि खासगी क्षेत्रातील भागीदारी अधिक बळकट होणे आवश्यक आहे.

कॉर्पोरेट क्षेत्राच्या सामाजिक बांधिलकीचे हे एक उत्कृष्ट उदाहरण ठरत असल्याचे नमूद करुन मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, अफकॉन्सने शिक्षण क्षेत्राबरोबरच महिला सक्षमीकरण आणि आरोग्यविषयक उपक्रमांमध्ये केलेली गुंतवणूक ही शाश्वत विकासाच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. समाजातील गरजू घटकांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी अशा सीएसआर उपक्रमांची भूमिका अत्यंत मोलाची ठरते.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# शाळापूर्व तयारी आढावा बैठक संपन्न; प्रवेशोत्सवासाठी मनपाचे नियोजन

## विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेबरोबरच सुरक्षेलाही प्राधान्य देणार-आयुक्त अमोल येडगे

छत्रपती संभाजीनगर दि.१२ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका शिक्षण विभागांतर्गत कार्यरत असलेल्या ५० शाळांमध्ये नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभासाठी आणि शाळा प्रवेशोत्सव यशस्वीपणे राबविण्यासाठी मनपा आयुक्त अमोल येडगे यांच्या अध्यक्षतेखाली सर्व मुख्याध्यापकांची शाळापूर्व तयारी आढावा बैठक संपन्न झाली.

महानगरपालिकेच्या शाळांमध्ये अधिकाधिक विद्यार्थ्यांनी प्रवेश घ्यावा तसेच शाळेचा पहिला दिवस उत्साहपूर्ण वातावरणात साजरा व्हावा, यासाठी १५ जून २०२६ रोजी प्रवेशोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त प्रत्येक शाळेत महानगरपालिकेचे वर्ग-१ व वर्ग-२ दर्जाचे अधिकारी 'पालक अधिकारी' म्हणून उपस्थित राहणार असून त्यांच्या हस्ते नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत, पाठ्यपुस्तकांचे वितरण तसेच गणवेश वाटप करण्यात येणार आहे. यासाठी ५० अधिकाऱ्यांची पालक अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.



बैठकीत आयुक्तांनी मुख्याध्यापकांना प्रवेशोत्सवाचे नियोजन, विद्यार्थ्यांची पटसंख्या वाढ, शैक्षणिक गुणवत्ता, नियमित उपस्थिती तसेच विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत आवश्यक मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण जितके महत्त्वाचे आहे, तितकीच त्यांची सुरक्षितता देखील महत्त्वाची असल्याचे त्यांनी यावेळी अधोरेखित केले.

यावेळी आयुक्त अमोल येडगे यांनी सर्व विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांना नवीन शैक्षणिक वर्षाच्या तसेच प्रवेशोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या. बैठकीस अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील, उपआयुक्त तथा शिक्षण विभाग प्रमुख अंकुश पांढरे, शिक्षणाधिकारी भारत तिनगोटे, प्रशासन अधिकारी संजीव सोनार, शिक्षण विस्तार अधिकारी रईसा खान बेगम, कार्यक्रम अधिकारी ज्ञानदेव सांगळे, विजय कोल्हे तसेच सर्व केंद्रीय मुख्याध्यापक व मुख्याध्यापक उपस्थित होते. बैठकीचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन कार्यक्रम अधिकारी ज्ञानदेव सांगळे यांनी केले.

# गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाचे मुख्य अभियंता कार्यालय नांदेडला हलवल्याच्या निषेधार्थ महामोर्चा

छत्रपती संभाजीनगर दि.१२ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर येथून गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाचे मुख्य अभियंता कार्यालय नांदेडला हलवल्याच्या निषेधार्थ आज, १२ जून रोजी शहरात महामोर्चा काढण्यात आला. कोणत्याही कॅबिनेट मंजुरीविना हे कार्यालय हलवण्यात आल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे. सेव्हन हिल उड्डाणपूल ते गोदावरी पाटबंधारे कार्यालयापर्यंत निघालेल्या या मोर्चात हजारो नागरिक सहभागी झाले होते.


या मोर्चामुळे जालना रोडवर मोठी वाहतूक कोंडी झाली. खासदार डॉ. कल्याण काळे, जिल्हा परिषद सदस्य विद्या रमेश गायकवाड, अभय टाकसाळ, माजी नगरसेवक रमेश जायभाय आणि प्रतीक गायकवाड यांच्यासह अनेक कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

'मराठवाडा बहुजन विकास आघाडी'ने या निर्णयावर तीव्र संताप व्यक्त केला आहे. त्यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करण्याची मागणी केली. आघाडीचे संस्थापक अध्यक्ष रमेश गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. यावेळी आंदोलकांनी मंत्री विखे-पाटील यांच्या फोटोवर अंडी फेकून निषेध नोंदवला आणि सरकारच्या विरोधात घोषणाबाजी केली.

रमेश गायकवाड यांनी सांगितले की, छत्रपती संभाजीनगर हे मराठवाड्याचे मध्यवर्ती मुख्यालय असताना, केवळ राजकीय स्वार्थापोटी कार्यालय हलवणे हा या भागावर अन्याय आहे. त्यांनी हा शासन निर्णय मागे न घेतल्यास यापुढेही तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला. आंदोलकांनी अनेक गंभीर मुद्दे उपस्थित केले. यात न्यायालयाचे आदेश असतानाही जायकवाडीचे हक्काचे पाणी जाणीवपूर्वक अडवण्यात आल्याचा आरोप करण्यात आला. पाणीटंचाईमुळे पिके करपून हजारो शेतकऱ्यांवर आत्महत्येची वेळ आल्याचेही त्यांनी नमूद केले. या परिस्थितीला जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर तत्काळ गुन्हे दाखल करण्याची मागणीही यावेळी करण्यात आली. आंदोलकांनी दावा केला की, आतापर्यंत ६० हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत आणि मंत्री विखे-पाटील यांच्या कार्यकाळात १३०० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचा आरोपही त्यांनी केला. या गंभीर प्रश्नावर मराठवाड्याचे खासदार डॉ. कल्याण काळे, आमदार अंबादास दानवे आणि रमेश गायकवाड यांच्यासह आघाडीचे शिष्टमंडळ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन जाब विचारणार आहे. शासनाच्या या धोरणाचा निषेध करण्यासाठी आजच्या मोर्चात सर्वपक्षीय नेते, शेतकरी आणि जनतेने मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

# आज सिडको-हडको भागात पाणीपुरवठा नाही

छत्रपती संभाजीनगर दि.१२ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर नवीन पाणीपुरवठा योजनेअंतर्गत टाकण्यात आलेल्या १५०० मि.मी. व्यासाचा मुख्य गुरुत्वजलवहिनीवर एन -५ आर-२ व एन-५ आर-३ जलकुंभांची जोडणीची कामे करण्याकरीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणने १४ तासांचा खंडण काळ मागितलेला आहे. या साठी मनपा आयुक्त यांनी दिलेल्या मान्यतेनुसार दिनांक १३/०६/२०२६ रोजी सकाळी ०७:०० वाजेपासून संध्याकाळी ०९:०० वाजेपर्यंत १११८ मि.मी. एक्स्प्रेस मुख्य जलवाहिनीवर खंडण काळ घेण्यात येणार आहे. याच खंडणकाळा दरम्यान सदर १११८ मि.



मी. व्यासाचा मुख्य जल वाहिनीवर जय विश्वभारती व गारखेडा जलकुंभकरिता छेद जोडणीची कामे करण्याचे नियोजन करण्यात आले आहे ज्याचा उपयोग भविष्यात होणार आहे.

वरील सर्व कामांसाठी एक्स्प्रेस जलवाहिनी रिकामी करणे छेद जोडणीची कामे करणे, दुरुस्ती नंतर जल वाहिनीमध्ये पाणी भरुन घेणे यासह वरील कामांसाठी प्रत्यक्ष कामाशिवाय ५ ते ६ तासांचा कालावधी लागणार आहे. या खंडकाळामुळे सिडको व हडको परिसराला पाणी पुरवठा होणार नाही, तसेच सदरील भागाचा पाणी पुरवठा एक दिवसाने पुढे ढकलण्यात आलेला आहे. कामाची अत्यावशक्यता लक्षात घेता काम त्वरित करणे गरजेचे असल्यामुळे या कामासह इतर कामे हाती घेण्यात आले आहेत. करिता नागरिकांना होणा-या गैरसोयीबाबत दिलगिरी व्यक्त करण्यात येत आहे. उपरोक्त परिस्थिती पाहता महानगरपालिकेस सहकार्य करावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# उपजलवाहिनीवरील तब्बल ९६ अनधिकृत नळ जोडण्या खंडित; शंभूनगरात मनपाची कारवाई

छत्रपती संभाजीनगर दि.१२ (प्रतिनिधी)- शहरातील पाणीपुरवठा व्यवस्थेला बाधा आणणाऱ्या आणि पाणी चोरीस कारणीभूत ठरणाऱ्या अनधिकृत नळ जोडण्यांविरोधात छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेने मोठी धडक कारवाई करत शंभूनगर परिसरातील १५० मिमी उपजल वाहिनीवरील तब्बल ९६ अनधिकृत नळ जोडण्या खंडित केल्या.

मनपा आयुक्त अमोल येडगे यांच्या कडक आदेशानुसार आज (दि. १२ जून) त्रिशरण चौकाजवळील शंभूनगर परिसरातून गादिया विहारकडे जाणाऱ्या रस्त्यावरील पुलावरून जाणाऱ्या उपजल वाहिनीवर ही विशेष मोहीम राबविण्यात आली. या कारवाईमुळे शहरातील पाणी चोरीवर आळा बसण्यास मदत होणार असून अधिकृत नळधारकांना नियमित व पुरेसा पाणीपुरवठा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.



आयुक्तांनी शहरातील सर्व मुख्य व वितरण जलवाहिन्यांचे सर्वेक्षण करून अनधिकृत नळ जोडण्या शोधून काढण्याचे तसेच त्या तातडीने खंडित करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार मनपाच्या पथकांनी विविध भागांत मोहीम सुरू केली असून शंभूनगरातील ही आतापर्यंतची मोठी कारवाई करण्यात आली आहे.

अतिरिक्त आयुक्त-२ कल्पिता पिंपळे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पथक अभियंता रोहित इंगळे यांच्या नेतृत्वाखाली ही मोहीम राबविण्यात आली. यावेळी अतिरिक्त शहर अभियंता अनिल तनपुरे, कार्यकारी अभियंता वसंत भोये, उपअभियंता किरण धांडे, शाखा अभियंता महेश चौधरी, कनिष्ठ अभियंता सुशिल कुलकर्णी आणि दुय्यम आवेक्षक सचिन वसावे यांच्यासह मनपाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलीस निरीक्षक सचिन कुंभार, सहायक फौजदार चंद्रकांत पोटे, हेड कॉन्स्टेबल गजानन महेर, विजू बोरसे, महिला अंमलदार रजेला भिल्ल, निता मोथुळे तसेच नागरी सहाय्यक पथकाचा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

अनधिकृत नळ जोडण्या आणि पाणी चोरीमुळे अधिकृत ग्राहकांना मोठ्या प्रमाणात पाणीटंचाईचा सामना करावा लागत असल्याने महानगरपालिकेने अशा प्रकारच्या कारवायांचा धडाका पुढील काळातही कायम ठेवण्याचा इशारा दिला आहे. शहरातील पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी आणि प्रत्येक अधिकृत ग्राहकापर्यंत पुरेसे पाणी पोहोचविण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचे मनपा प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# आयुष्मान भारत कार्ड मोहिमेला वेग, महानगरपालिकेचा नागरिकांच्या आरोग्य सुरक्षेसाठी पुढाकार

छत्रपती संभाजीनगर दि.१२ (प्रतिनिधी)- महानगरपालिकेचे आयुक्त अमोल येडगे यांच्या निर्देशानुसार, अतिरिक्त आयुक्त-२ श्रीमती कल्पिता पिंपळे यांच्या मार्गदर्शनाखाली व डॉ. उज्वला भामरे यांच्या समन्वयाने आरोग्य विभागामार्फत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना आयुष्मान भारत कार्ड ई-केवायसी करून कार्ड काढण्याची मोहीम राबविण्यात येत आहे. या उपक्रमामुळे शहरातील अधिकाधिक नागरिकांना शासनाच्या आरोग्य संरक्षणाचा लाभ मिळणार आहे.



आयुष्मान भारत योजना ही देशातील सर्वसामान्य व गरजू नागरिकांसाठी वरदान ठरत असून, या योजनेअंतर्गत पात्र कुटुंबांना उपचारांसाठी आर्थिक संरक्षण उपलब्ध होते. या योजनेअंतर्गत पात्र लाभार्थी कुटुंबांना प्रतिवर्ष ५ लाखांपर्यंतचे आरोग्य विमा संरक्षण उपलब्ध होत असून, विविध शासकीय व मान्यताप्राप्त रुग्णालयांमध्ये उपचारांची सुविधा मिळते. गंभीर आजारांच्या उपचारांमुळे होणारा आर्थिक भार कमी करण्यासाठी हे कार्ड अत्यंत उपयुक्त ठरत आहे. पात्र लाभार्थी महानगरपालिकेच्या सर्व आरोग्य केंद्रांमध्ये भेट देऊन आयुष्मान भारत कार्ड ई-केवायसी व कार्ड निर्मितीची सुविधा सहजपणे प्राप्त करू शकतात. महानगरपालिकेच्या मान्यतेनुसार युग इन्फ्राटेक सर्व्हिसेस प्रा. लि., आशा सेविका, एम पी डब्ल्यु तसेच आरोग्य विभागातील कर्मचारी यांच्या संयुक्त प्रयत्नातून प्रत्येक पात्र लाभार्थ्यापर्यंत पोहोचून आयुष्मान कार्ड काढण्याची प्रक्रिया सुलभ करण्यात आली आहे. महानगरपालिका आरोग्य विभागामार्फत सर्व झोन, आरोग्य केंद्रे, दिव्यांग आयुष्मान कार्ड मोहिम, शासकीय व खाजगी कार्यालये अंतर्गत विविध मोहिम राबविण्यात आल्या आहेत. त्या अनुषंगाने आतापर्यंत एकूण ५,२६,४६६ आयुष्मान कार्ड काढण्यात आले आहे. नागरिकांनी या संधीचा लाभ घेत आपल्या कुटुंबाचे आरोग्य संरक्षण सुनिश्चित करावे, असे आवाहन आयुक्त यांच्या मार्फत करण्यात येत आहे. आयुष्मान भारत कार्ड हे केवळ एक ओळखपत्र नसून, गरजेच्या वेळी कुटुंबाला आर्थिक आधार देणारे आणि गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवांचा मार्ग खुला करणारे संरक्षण कवच आहे. महानगरपालिका प्रशासनाचे उद्दिष्ट शहरातील प्रत्येक पात्र लाभार्थ्यापर्यंत आयुष्मान भारत योजनेचा लाभ पोहोचविण्याचे असून, यासाठी सर्व संबंधित यंत्रणा समन्वयाने कार्यरत आहेत.

# श्रमशक्ती व असंघटित क्षेत्रातील उद्योगांच्या वार्षिक सर्वेक्षणास प्रारंभ




छत्रपती संभाजीनगर दि.१२ (प्रतिनिधी)- रोजगार, बेरोजगारी आणि असंघटित क्षेत्रातील उद्योगांची अचूक व अद्ययावत माहिती उपलब्ध करून देण्यासाठी राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयामार्फत नियतकालिक श्रमशक्ती सर्वेक्षण २०२६ तसेच असंघटित क्षेत्रातील उद्योगांचे वार्षिक सर्वेक्षण २०२६ राबविण्यात येणार आहे. जिल्ह्यातील सर्वेक्षणास आज जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांच्या हस्ते सुरुवात करण्यात आली.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजीत या कार्यक्रमास सह आयुक्त नियोजन एस.बी. वरसाळे, जिल्हा सांख्यिकी अधिकारी नरेंद्र कदम, जिल्हा नियोजन अधिकारी ममता हटकर, सहा. नियोजन अधिकारी लक्ष्मीकांत थोंटे तसेच अन्य अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

नियतकालिक श्रमशक्ती सर्वेक्षण अंतर्गत श्रम शक्ती सहभाग दर, कामगार-लोकसंख्या गुणोत्तर आणि बेरोजगारी दर यांसारखे प्रमुख श्रमबाजार निर्देशांक तयार केले जातात. हे निर्देशांक ग्रामीण व शहरी भागांसाठी मासिक, त्रैमासिक तसेच वार्षिकस्तरावर प्रसिद्ध केले जाणार आहेत. याशिवाय, विविध वयोगट, लिंग, शिक्षणाची पातळी, रोजगार स्थिती, उद्योग व व्यवसाय यानुसार सविस्तर आकडेवारी वार्षिक अहवालाद्वारे उपलब्ध करून दिली जाणार आहे. तसेच भारतीय अर्थव्यवस्थेतील महत्त्वपूर्ण असलेल्या असंघटित क्षेत्राची आर्थिक व कार्यात्मक माहिती संकलित करण्यासाठी असंघटीत क्षेत्रातील उद्योगांचे वार्षिक सर्वेक्षण २०२६ हे सर्वेक्षण आयोजित करण्यात आले आहे. या सर्वेक्षणात उत्पादन, व्यापार आणि इतर सेवा क्षेत्रांतील असंघटित, बिगर-कृषी आस्थापनांचा समावेश असेल. या सर्वेक्षणातून रोजगार निर्मिती, उत्पादन, उत्पन्न, व्यवसायाची स्थिती आणि राष्ट्रीय उत्पन्नातील योगदान याबाबतची महत्त्वपूर्ण माहिती उपलब्ध होणार आहे.

ही पाहणी 'महास्ट्राईड' प्रकल्पांतर्गत जागतिक बँकेच्या सहकार्याने आणि अर्थ व सांख्यिकी आयुक्ताल याच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणार आहे. या पाहणीचे क्षेत्रीय कामकाज आयपीएसओएस या बाह्य संस्थेमार्फत करण्यात येणार आहे.

या सर्वेक्षणातून संकलित केलेली माहिती पूर्णपणे गोपनीय ठेवली जाते. तरी सर्वेक्षणास आलेल्या प्रगणकांना सहकार्य करावे. निवडलेल्या कुटुंबांनी व आस्थापनांनी सर्वेक्षणासाठी येणाऱ्या अधिकृत प्रगणकांना योग्य व अचूक माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी केले आहे.

(पान १ वरुन)

## १९५० नंतरचा सर्वात भीषण एल निनो सक्रिय

जून मध्ये सक्रिय होणार पण आता गेल्या महिन्याभरातला प्रशांत महासागराचे तापमान पाहून सीपीसीने कालच जाहीर केलं की, एल निनो सक्रिय झालेला आहे. याची तीव्रता उत्तरोत्तर वाढत जाणार आहे आणि ते डिसेंबर पर्यंत सर्वाधिक राहण्याची शक्यता आहे, अशी माहिती त्यांनी दिली आहे. एल निनोचे वेगवेगळे टप्पे असतात, म्हणजे तीव्र, अतितीव्र जसा मध्ये आपण सुपर एल निनो असं पण एक संज्ञा वापरली जात होती. अतितीव्र स्वरूपामध्ये म्हणजे तिथलं तापमान हे सरासरी पेक्षा दोन ते अडीच अंशापर्यंत जास्त राहण्याची शक्यता आहे, बऱ्याच जणांनी सांगितलं होतं की तीन अंशापर्यंत राहू शकत त्या त्यापेक्षा पण जास्त राहू शकत पण सीपीसीच्या अंदाजामध्ये तसं दाखवण्यात आलेल नाही, पण तरी सुद्धा १९५० पासूनचा हा सर्वात तीव्र एल निनो राहण्याची शक्यता आहे. जेव्हा तीव्र एल निनो असतो तेव्हा त्याचे परिणाम जगामध्ये ज्या ज्या पद्धतीने असतात,तर ते हमखास होतात असं आतापर्यंतच्या याद्यावरून जे काही नोंदी आहेत त्यावरून दिसून आले. त्यापैकी भारत किंवा भारतीय उपखंडावरचा जो त्याचा परिणाम असतो, तो म्हणजे या भागामधला सरासरीपेक्षा पाऊस कमी होत असतो, अर्थात तो पाऊस होतच नाही असं नाही पण तो कमी होतो आणि स्वाभाविकपणे त्याला धरूनच ते अपेक्षित धरून आय एमडीने पण वर्तवले की यंदाचा पाऊस सरासरी पेक्षा ९०% पर्यंत राहू शकतो, पण त्यामध्ये सुद्धा आपण ५% कमी अधिक धरलेले आहे, त्यामुळे जेव्हा आपण ९०% भारतामध्ये पाऊस म्हणतो सरासरीच्या तुलनेमध्ये त्यावेळेस त्याचे प्रादेशिक वितरण पण कमी जास्त असतं, त्यामुळे ज्या भागामध्ये पाऊस ऑलरेडी कमी असतो, तिथे आणखीन पण कमी झाला, तर मात्र दुष्काळासारखी स्थिती उद्भवू शकते. एल निनो आता जूनच्या सुरुवातीलाच जाहीर झालाय, की तिथे सक्रिय झालाय त्यामुळे मॉन्सूनच्या प्रगतीपासून जे काही जुलै ऑगस्टमध्ये त्याच्यामध्ये सक्रिय कालखंड असतात, ब्रेक असतात, तर त्याच्यावर सुद्धा एलनिनोचा प्रभाव राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे हा संपूर्ण हंगामच एलनिनोच्या प्रभावाखाली राहण्याची शक्यता आता निर्माण झालेली आहे, अशी माहिती प्रभुणे यांनी दिली आहे.

## अमेरिकेची धोरणं धरसोडीची;...

पुरवठादार होता.''

''युक्रेन युद्धापूर्वी भारत रशियन कच्च्या तेलाचा मोठा खरेदीदार नव्हता. २०२२ पर्यंत आम्ही रशियन तेलाची फारशी खरेदी केली नव्हती. मात्र, परिस्थितीमुळे आम्हाला त्या बाजारात उतरणं भाग पडलं. मला हे आवर्जून सांगावं लागेल की, रशियन पुरवठादार हे सातत्यपूर्ण राहिले आहेत. ते तेलाचा साठा उपलब्ध करून देतात आणि मग तुम्ही तिथे जाऊन जी सर्वात वाजवी दरात व सहज उपलब्ध असलेल्या तेलाची खरेदी करतो'', असं एस.जयशंकर यांनी स्पष्ट केलं.

## राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाचा...

नाना पटोले यांनी दिल्लीला रवाना होण्यापूर्वी विमानतळावर प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. त्यावेळी पटोले यांनी म्हटले की, राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाचा प्रस्ताव ऑलरेडी पवार साहेबांना दिला होता. मात्र, काही कारणास्तव त्यावर निर्णय घेण्यास उशीर झाला. आता देशातील राजकारणात जे काही चाललं आहे, देशाची संविधानिक व्यवस्था संपत चालली आहे. अशावेळी सेक्युलर मतांचं विभाजन थांबवण्यासठी, देश वाचवण्यासाठी, संविधान वाचवायला, जे काही सेक्युलर विचारांचे पक्ष आहे, त्यांनी एकत्रित यावे, अशी प्रक्रिया सुरु झाली आहे, असे नाना पटोले यांनी म्हटले.

भाजपला रोखण्यासाठी देशपातळीवर सेक्युलर आघाडी उभी करण्यासाठी पवार साहेब, तृणमूल काँग्रेस हे सगळे काँग्रेसमध्ये विलीनीकरण करायचं, या मानसिकतेत आहेत. राहुल गांधी, मल्लिकार्जून खरगे, सोनिया गांधी या सगळ्यांकडून यासंदर्भात विचारमंथन सुरु आहे. सेक्युरल मतांना एकत्रित करणे, सेक्युलर विचार संपवणाऱ्या मोदी सरकारला सत्तेतून बाहेर काढणे हा एकमेव अजेंडा आहे. मोदी सरकारकडून देशातील लोकशाही संपुष्टात आणण्याचं आणि पाळंमुळं खोदण्याचं काम सुरु आहे, अशी टीकाही नाना पटोले यांनी केली.

## मोदी सर्वाधिक काळ पंतप्रधान तसेच...

यापेक्षा त्या काळात देशासाठी काय काम झाले हे अधिक महत्त्वाचे असते. मोदी यांनी जगभरात भारताची प्रतिष्ठा उंचावली असून आज एनडीए देशातील २२ राज्यांमध्ये सत्तेत आहे. देशाच्या सुमारे ८० टक्के भूभागावर एनडीएची सरकारे आहेत, असे त्यांनी सांगितले.

देशाच्या आर्थिक प्रगतीचे आकडे मांडताना फडणवीस म्हणाले की, भारत आज जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनला आहे. जागतिक मंदीचे वातावरण असतानाही भारताचा विकासदर ७ टक्क्यांहून अधिक आहे आणि जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था म्हणून भारताची ओळख निर्माण झाली आहे.

## डिझेल खरेदीवर केंद्र सरकारची मर्यादा;...

डिझेल खरेदी करता येणार नाही. अशा ग्राहकांनी त्यांच्या गरजांसाठी स्वतःच्या ग्राहक पंपांमधूनच इंधनाचा पुरवठा करावा लागेल.

पेट्रोल पंप चालकांना डिझेलची विक्री केवळ वाहनाच्या टाकीत किंवा मान्यताप्राप्त कंटेनरमध्येच करता येईल. या शिवाय एका ग्राहकाला किंवा वाहनाला दिवसाला २०० लिटरपेक्षा अधिक डिझेल विकता येणार नाही. अशा प्रकारे खरेदी केलेल्या डिझेलची पुनर्विक्री करण्यास मनाई करण्यात आली आहे.


MAHAGENCO
Maharashtra State Power Generation Co. Ltd.

### NOTICE INVITING e-TENDER

| Sr. No. | Tender No. | Tender Details | Estimate Amount Rs. | EMD in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1. | 3000069436 | work of insulation of unit-1 stator | 18,376,068.00/- | 187,260.68/- |

Tender Cost: Rs.1180.00
Contact Person: Superintending Engineer, RENEWABLE ENERGY CIRCLE, Ghatghar
Tel. No. 0253 2810185 / 2810485
For further details visit our Web site : https://eprocurement.mahagenco.in
1. All interested vendors are requested to register to our web site for e-tender : https://eprocurement.mahagenco.in
2. Actual quantum of work is to be accessed by the bidder before submitting the tender documents.

Superintending Engineer,
REC Ghatghar

MAHAGENCO
Maharashtra State Power Generation Co. Ltd.

### NOTICE INVITING e-TENDER

| Sr. No. | Tender No. | Tender Details | Estimate Amount Rs. | EMD in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1. | 3000069624 | Supply, Installation, Testing & Commissioning of mechanical over speed protection device for Unit No.3 at Yeldari HPS. | 4,45,000/- | 7950/- |

Tender Cost: Rs.1180.00
Contact Person: Superintending Engineer, RENEWABLE ENERGY CIRCLE, Ghatghar
Tel. No. 0253 2810185 / 2810485
For further details visit our Web site : https://eprocurement.mahagenco.in
1. All interested vendors are requested to register to our web site for e-tender : https://eprocurement.mahagenco.in
2. Actual quantum of work is to be accessed by the bidder before submitting the tender documents.

Superintending Engineer,
REC Ghatghar